तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड, अहिल्यानगर. फोन : 2327060 मो. 9850799850



संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०३.०२.२०२६ | अंक नं. २५३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवान जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

फायद्याच फायदा !
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-*
2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# भारतीय शेअर बाजारात मोठी उसळी

## सेन्सेक्स २,४१३ अंकांनी तर निफ्टी ७३४ अंकांनी वधारला

मुंबई - भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेनंतर, प्रमुख भारतीय निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी ३ फेब्रुवारी रोजी वाढीसह उघडले. सकाळी ११:४० वाजता, सेन्सेक्स २,४१३ अंकांनी किंवा २.९५ टक्क्यांनी वाढून ८४,०७९ वर होता, तर निफ्टी ७३४ अंकांनी किंवा २.९३ टक्क्यांनी वाढून २५,८२३ वर पोहोचला. बाजाराच्या सुरुवातीला बाजाराची स्थिती निर्णायकपणे सकारात्मक होती. वाढलेल्या शेअर्सची संख्या घसरलेल्या शेअर्सच्या तुलनेत खूप जास्त होती.

अमेरिका भारतावरील आयात शुल्कामध्ये कपात करत असल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी रात्री केली. आता हे शुल्क २५ टक्क्यांऐवजी १८ टक्के असेल आणि त्याची अंमलबजावणी तत्काळ प्रभावाने लागू होईल, असेही ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर लिहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून संभाषण झाल्यानंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली. आज सकाळपासून शेअर बाजारात मोठी उसळी पाहायला मिळत आहेत. तर दुसरीकडे सोने आणि चांदीचे भावही वाढले आहेत.

२ फेब्रुवारीला जेव्हा बाजार बंद झाला होता तेव्हा मार्केट कॅप ४,५५,०३,८७७.३२ कोटी रुपये होते. तर आज बाजार उघडताच तो उसळून ४,७८,१२,०१७.९६ कोटी रुपये झाला. त्यामुळे गुंतवणुकदारांनी एका झटक्यात २३ लाख कोटींची कमाई केली. बाजारात तेजीचे सत्र कायम आहे. सकाळच्या सत्रात शेअर बाजाराचा प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स जवळपास ३ टक्के तेजीसह ८३,९७४.६५ वर ट्रेड करत होता. तर निफ्टी ५० जवळपास २५,८१२.६५ वर व्यापार करत होता. विशेष म्हणजे 'गिफ्ट निफ्टी' २६,१५० च्या पार गेल्याने आज बाजार विक्रमी पातळीवर बंद होण्याची दाट शक्यता आहे.


### सर्वच क्षेत्रातील निर्देशांकात झाली वाढ

बांधकाम क्षेत्रातील सर्व शेअर तेजीतत आहे. निफ्टी रियल्टी इंडेक्स ४ टक्क्यांहून अधिकने वधारला आहे. याशिवाय ऑटो, इन्फ्रास्ट्रक्चर, ग्राहकाभिमूख वस्तू,आयटी आणि मेटल क्षेत्रातील शेअरमध्ये जोरदार खरेदी दिसून आली. बँकिंग शेअर्स पण तेजीत आहेत. निफ्टी खासगी बँकांचा शेअर जवळपास ३ टक्के आणि निफ्टी बँक २.५ टक्क्यांहून अधिकने वधारला आहे. नवीन व्यापार कराराचा हा परिणाम असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

# तहसील कार्यालयातील महिला सहाय्यकास सात हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

नगर - न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नमुद मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेश तहसिलदार यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी तक्रारदाराकडे ७ हजार रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारताना कोपरगाव तहसील कार्यालयातील महसूल सहायक वर्ग ३ श्रीमती अंजना पंडीत पवार (वय ३६) यांना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई २ फेब्रुवारी रोजी कोपरगाव तहसील कार्यालयात करण्यात आली.

मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेश तहसिलदार यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी महसूल सहायक श्रीमती अंजना पवार यांनी तक्रारदाराकडे ७ हजार रूपये लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे संपर्क साधला. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे यांच्या नेतृत्वाखाली पो.कॉ. गजानन गायकवाड, पो.कॉ सचिन सुदुक, पो.कॉ. वैभव सुपेकर, चालक पो.हे.कॉ. हारुन शेख यांच्या पथकाने २ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालय परिसरात सापळा लावला. यावेळी श्रीमती पवार यांना तक्रारदाराकडे ७ हजाराच्या लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. लोकसेवक श्रीमती अंजना पवार यांनी तहसिल कार्यालय, कोपरगाव येथे ७ हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारून स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याच्या हेतुन गुन्हेगारी गैरवर्तन केले. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध कोपरगाव शहर पोलीस स्टेशन भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपअधिक्षक अजित त्रिपूटे करत आहेत.


॥ भावपुर्ण श्रद्धांजली ॥
वाटले नव्हते आम्हाला,
असे अघटीत घडून येईल..
चालता बोलता देव तुम्हला,
आमच्यातुन असे दूर घेवून जाईल...
दशक्रिया विधी
गुरुवार दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी,
स्थळ : अमरधाम, नालेगांव,
अहिल्यानगर येथे होईल.
टिप : ह.भ.प. कृष्णा महाराज रायकर (पिंपळगाव माळवी) यांचे प्रवचन होईल
स्व. पांडुरंग गंगाधर बनकर
स्व.दि. २७/०१/२०२६
दु:खांकित
श्री. संतोष पांडुरंग बनकर (मुलगा) — श्री. मोहन गंगाधर बनकर (भाऊ)
श्री. संदिप पांडुरंग बनकर (मुलगा) — श्री. शांताराम विठ्ठल बनकर (पुतणे)
सौ. जयश्री दत्तात्रय बोडखे (मुलगी) — चि. प्रतिक संतोष बनकर (नातु)
चि. प्रसन्न संतोष बनकर (नातु) — कु. राधिका सतिष बनकर (नात)
समस्त बनकर परिवार अहिल्यानगर

# शालेय पोषण आहाराच्या नगरमधील गोडावूनवर हल्ला; गाड्यांची तोडफोड; खंडणीची केली मागणी

## ६ जणांच्या टोळक्यावर गुन्हा दाखल

नगर - कामावरून काढून टाकल्याचा राग मनात धरून एका माजी सुपरवायझरने पाच ते सहा साथीदारांसह जिल्ह्यात शालेय पोषण आहार पुरवणाऱ्या वितरकाच्या गोडाऊनवर हल्ला केला. वितरकाला खंडणीची मागणी करत गोडावून मध्ये उभ्या असलेल्या आहार वाहतूक करणाऱ्या ६ गाड्यांच्या काचा फोडून सुमारे १ लाख १० हजार रुपयांचे नुकसान केल्याची घटना १ फेब्रुवारीला रात्री १०.३० ते ११ वाजण्याच्या सुमारास शहरातील जुन्या बोल्हेगाव रोडवरील क्रोनोस फिटनेस च्या पाठीमागे असलेल्या गोडावूनमध्ये घडली. या प्रकरणी दत्ता गोरख सोनवणे (रा. अमरधामच्या पाठीमागे, कल्याणरोड) याच्यासह त्याच्या ५ अनोळखी साथीदारांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर मोहन पाटील (वय ३२, रा. जय मल्हारनगर, नवनागापूर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पाटील हे प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजनेचे जिल्हा प्रतिनिधी असून त्यांचे जुना बोल्हेगाव रोडवर गोडाऊन आहे. जिल्ह्यातील ज्या शाळा अनुदानित आहेत, त्यांना शालेय पोषण आहार पुरविण्याचे काम ते करतात. त्यासाठी त्यांच्या कडे २२ वाहने आहेत. त्यांच्या कडे या पूर्वी आरोपी दत्ता गोरख सोनवणे हा सुपरवायझर म्हणून कामाला होता. मात्र तो कामात दुर्लक्ष करत, वाहनचालक व गोडावून मधील कर्मचाऱ्यांना दमदाटी करत असे, विनाकारण कोणालाही पैसे मागत असे त्यामुळे फिर्यादी पाटील यांनी त्यास कामातील हलगर्जीपणामुळे नोव्हेंबर २०२५ मध्ये कामावरून काढले होते. तेव्हापासून तो पाटील यांना भेटून अथवा फोन करून तुला व्यवसाय करायचा असेल तर मला १ लाख रुपये दे नाहीतर तुला जीवे मारून टाकील अशी धमकी देऊन खंडणी मागत होता. भीतीपोटी पाटील यांनी जानेवारी २०२६ मध्ये त्याला ५० हजार रुपये रोख स्वरुपात दिले होते. मात्र, त्यानंतरही १ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० च्या सुमारास दत्ता सोनवणे याने पाच अनोळखी साथीदारांसह गोडावूनवर येऊन धुमाकूळ घातला. तेथील कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन तीन पिकअप, एक मिनी ट्रक आणि दोन टेम्पोची दगडफेक करून मोठी तोडफोड केली. पाटील यांना फोन करून शिवीगाळ करत 'आता माझी दुश्मनी बघ' अशी धमकीही दिली. फिर्यादी पाटील यांनी रात्री गोडावून मध्ये जावून पाहणी केली असता त्यांच्या गाड्यांचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. अखेरीस पाटील यांनी तोफखाना पोलिस स्टेशन गाठून तक्रार दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी दत्ता सोनवणे व त्याच्या साथीदारांविरुद्ध खंडणी आणि तोडफोडीचा गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार योगेश चव्हाण करत आहेत.


चतुर्थ पुण्यस्मरण
वाट दाखविली सुसंस्काराची
सावली होती आधाराची
प्रणाम आपल्या व्यक्तीमत्वाला
साथ लाभली आम्हा आपल्या आशीर्वादाची..
तुमच्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
शोकाकुल
ह.भ.प. गं.भा. लक्ष्मीबाई शांतानंद डोके
स्व. वा.माघ शु. ४ शके १९४३
शुक्रवार दि. ४-२-२०२२
बापुसाहेब डोके व समस्त डोके पाटील परिवार
kalika

लई भारी ! १ नंबर
भारत देशकी सर्वतम श्रेष्ठ खुशबु
परिमल भारतवासि अगरबत्ती
२०,३२,१००,२००
ग्रॅम मध्ये उपलब्ध
अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अहमदनगर. फोन : २३५८०५०

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता
सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा :
कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

FRP CHAMBER COVER
कॅपॅसिटी
2.5 टन
5 टन
मध्ये उपलब्ध आहे!
वन पीस बेसिन उपलब्ध आहेत
भरपूर व्हरायटी
भरपूर रंगसंगती
आपल्या घराला द्या आकर्षक लुक
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
8975979999 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE


मायेची गेली सावली!
करुनेचा हरवला सागर!
उरली नाही साथ आम्हाला!
आठवण येते क्षणाक्षणाला!
भावपूर्ण श्रध्दांजली
कै. नंदाकिनी विठ्ठलराव हिंगणगांवकर
यांचे मिती शु. १० शके १९४७ बुधवार दि.२८/०१/२०२६ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांचा
दशक्रीया विधी
शुक्रवार दिनांक ०६/०२/२०२६ रोजी
स. ८ वा. अमरधाम, नालेगांव, अहिल्यानगर येथे होणार आहे.
शोकाकूल
श्री. विठ्ठलराव काशिनाथ हिंगणगांवकर
श्री. प्रकाश विठ्ठलराव हिंगणगांवकर — सौ. मंगल सुरेश कुलथे (मुलगी)
श्री. अरुण जनार्धन हिंगणगांवकर — सौ. कमल रामभाऊ मैड (मुलगी)
श्री. विजय जनार्धन हिंगणगांवकर — सौ. आरती दिपकराव नागरे (मुलगी)
श्री. राजेंद्र प्रकाश हिंगणगांवकर (नातु) — चि. आर्यन राजेंद्र हिंगणगांवकर (पणतु)
हिंगणगांवकर (मुंडलिक) परिवार

वासन टोयोटा-अहिल्यानगर
WASAN TOYOTA
अहिल्यानगरमध्ये ग्राहकांच्या सुविधेसाठी नवीन प्रशस्त 2S
We are growing and to help extend our operations we require...
WE ARE HIRING! JOIN OUR TEAM
WALK IN INTERVIEW
04 & 05 February 2026 at 10:00 am To 5:00 pm
Plot No.85-86, Sr.No.70 (A) Kedgaon, Dist.A.Nagar
Email: hr.ngr@wasantoyota.com | Contact : 9881240456

| सेल्स | जागा | सर्व्हिस | जागा | सर्व्हिस | जागा |
|---|---|---|---|---|---|
| टिम लिडर्स | १ | असिस्टंट सर्व्हिस मॅनेजर | १ | इलेक्ट्रिशियन कम एसी टेक | १ |
| सेल्स एक्सिक्युटिव्ह | ५ | असिस्टंट स्पेअर पार्ट मॅनेजर | १ | मास्टर टेक्निशीयन लेव्हल | १ |
| असिस्टंट ॲक्सेसरीज मॅनेजर | १ | रिसेप्शनिस्ट | १ | ईव्ही टेक्निशीयन | १ |
| कस्टमर केअर एक्सिक्युटिव्ह | १ | कस्टमर केअर एक्सिक्युटिव्ह | १ | स्पेअर पार्ट पीकर | १ |
| इन्शुरन्स एक्सिक्युटिव्ह | २ | सर्व्हिस ॲडव्हायझर | १ | बॉडी शॉप टेक्निशीयन | १ |
| फायनान्स एक्सिक्युटिव्ह | १ | बॉडीशॉप ॲडव्हायझर | २ | वॉशिंग सुपरवायझर | १ |
| ॲक्सेसरी एक्सिक्युटिव्ह | १ | ट्रेनर सर्व्हिस | १ | वॉशिंग बॉय | ५ |
| एक्सिक्युटिव्ह मार्केटींग | १ | पीडीआय टेक्निशीयन | १ | टुल रुम & मेन्टेनन्स एक्सिक्युटिव्ह | १ |
| ॲक्सेसरीज फिटर | १ | ड्रायव्हर | १ | डेंटर | ४ |
| ड्रायव्हर | १ | टेक्निशीयन | ५ | पेंटर | ४ |

EXPECTED
Good Communication skills and Basic Knowledge of Marathi, Hindi & English
PROVIDED
Best in Class salary and incentives Petrol and mobile allowance sales Toyota Training.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कामरगाव येथील माळवाडी नजीकच्या वस्तीचे 'समतानगर' नामांतर; फलकाचे अनावरण; ग्रामपंचायतीचा ठराव मंजूर, समता व एकतेचा संदेश

नगर - कामरगाव (ता. जि. अहिल्यानगर) येथील माळवाडी नजीक असलेल्या रहीवासी वस्तीचे 'समतानगर' असे नामांतर करण्यात आले आहे. या सामाजिक समता, समानता व बंधुभावाचा संदेश देण्यासाठी भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांच्या संकल्पनेतून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे नामांतर करण्यात आले.

कामरगाव ग्रामपंचायतीने याबाबत अधिकृत ठराव संमत केला असून, त्यानंतर या नामांतराचे फलक परिसरात लावण्यात आले आहेत. या फलकाचे नुकतेच अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांची उपस्थिती लाभली.



कामरगाव येथील माळवाडी नजीक असलेल्या रहिवासी वस्तीचे 'समतानगर' नामांतर करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना गणेश बनकर यांनी सांगितले की, समतानगर हे नाव सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक आणि एकतेचा संदेश आहे. या परिसरातील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात, यासाठी रस्ता, वीज, पाणी यांसारख्या पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आजचा हा कार्यक्रम केवळ एका वस्तीचे नामांतर नाही, तर तो सामाजिक परिवर्तनाचा एकतेचा आणि समतेच्या विचाराचा एक टप्पा आहे. प्रत्येक नागरिकाला सन्माना मिळावा या भावनेतून समतानगर हे नाव देण्यात आले असल्याचेही बनकर यांनी सांगितले.

कार्यक्रमास सरपंच संदीप ढवळे, कामरगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन सुदाम ठोकळ, माजी सरपंच तुकाराम कातोरे, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण शामराव ठोकळ, मधुकर झरेकर, राजू शिंदे, मेजर दादा झरेकर, गणेश आंधळे, राधाकृष्ण चौधरी, वैभव लाळगे, करण कातोरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरपंच संदीप ढवळे यांनी केले. मेजर राजू शिंदे यांनी आभार मानले.

# नगर कल्याण रोडवर वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर - भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर-कल्याण महामार्गावर नेप्ती शिवारात घडली आहे. सागर धोंडीभाऊ केदार (रा.निमगाव वाघा, ता.नगर) असे मयताचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत मयताचे चुलत भाऊ गुलाब विठ्ठल केदार (रा. निमगाव वाघा, ता.नगर) यांनी २ फेब्रुवारी रोजी फिर्याद दिली आहे. निमगाव वाघा येथील रहिवासी सागर केदार हे ३१ जानेवारी रोजी सायंकाळी त्यांच्या दुचाकीवरून (क्र. एमएच १६ सीबी ८६३०) प्रवास करत होते. रात्री पावणेआठच्या सुमारास नेप्ती शिवारातील सागर भेळ सेंटरजवळ आले असता, मागून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरात धडक दिली. धडक इतकी भीषण होती की सागर यांचा गंभीर दुखापत होऊन जागीच मृत्यू झाला. अपघात केल्यानंतर अज्ञात चालक जखमीला मदत न करता किंवा पोलिसांना माहिती न देता वाहन घेऊन पसार झाला.

या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जगदीश जंबे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नगरमध्ये ५ ते ९ फेब्रुवारीदरम्यान 'कृषीपर्व' जिल्हा कृषी महोत्सव

नगर - कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद अहिल्यानगर व एक्सपो इंडियन ओशियन प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ५ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत नेमाने इस्टेट, केडगाव रोड येथे जिल्हा कृषी महोत्सव 'कृषीपर्व' व कृषी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, कृषी उत्पादनांचे प्रदर्शन व थेट खरेदी-विक्रीची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली आहे.

या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविला जात आहे.

महोत्सवात धान्य महोत्सव, खाद्य महोत्सव, कृषी प्रक्रिया उद्योगांचे प्रदर्शन, महिला बचत गटांनी तयार केलेली उत्पादने, कृषी यांत्रिकीकरण व निविष्ठांचे सुमारे पाचशे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. यात जामखेडची ज्वारी, अकोलेचा सुवासिक इंद्रायणी तांदूळ, हातसडीचा तांदूळ, गावरान मटकी, गहू, कडधान्य, फळे व भाजीपाला यांसह विविध कृषी प्रक्रिया पदार्थांची विक्री व प्रदर्शन करण्यात येईल.

कृषी क्षेत्रातील आधुनिक बदल लक्षात घेता महोत्सवात कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज आधारित उपाययोजना व काटेकोर शेती याविषयी माहिती देणारे विशेष स्टॉल असणार आहेत. यासोबतच खाद्य महोत्सवाच्या माध्यमातून शिपी आमटी, शिंगोरी आमटी, मांडे, थालपीठ यांसह विविध पारंपरिक गावरान खाद्यपदार्थांचा आस्वाद नागरिकांना घेता येईल.

या महोत्सवाच्या कालावधीत आयोजित कृषी परिषदेअंतर्गत कृषी विभागाशी संबंधित अधिकारी व विषयतज्ज्ञांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली असून त्यातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती, उत्पादनवाढ, कृषी प्रक्रिया उद्योग व बाजारपेठ व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन मिळणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला बचत गट, कृषी उद्योजक, विद्यार्थी व नागरिकांनी या जिल्हा कृषी महोत्सवाला उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.



सीए विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये अहिल्यानगरच्या रीत मेहेर हिने बेस्ट पेपर प्रेझेंटर या गटात प्रथम पारितोषिक पटकावले.

# अहिल्यानगरच्या रीत मेहेर यांना राष्ट्रीय पातळीवर प्रथम पारितोषिक

नगर - अहिल्यानगर येथील रीत निलेश मेहेर हिने आपल्या उत्कृष्ट सादरीकरण कौशल्याने राष्ट्रीयस्तरावर शहराचे नाव उज्वल केले आहे. नाशिक शाखा WICASA (The Western India Chartered Accountants Students' Association) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या CA विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये रीत मेहेर हिने Best Paper Presenter या गटात प्रथम पारितोषिक पटकावले.

सध्या पुणे येथे EY (Ernst Young) या संस्थेमध्ये आर्टिकलशिप करत असलेल्या रीत मेहेर हिने Startup Failures in India: Red Flags and Key Lessons या विषयावर आपले संशोधनपर सादरीकरण मांडले. भारतातील स्टार्टअप अपयशामागील कारणे, संभाव्य धोक्यांची लक्षणे आणि त्यातून घेता येणारे महत्त्वाचे धडे या विषयावर तिने सखोल अभ्यासासह आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी मांडणी केली.

तिच्या सादरीकरणातील स्पष्ट विचार, विषयावरील पकड, प्रभावी संवादकौशल्य आणि आत्मविश्वास यामुळे परीक्षक व उपस्थित प्रेक्षक विशेष प्रभावित झाले. रीत मेहेर ही गेल्या अनेक वर्षांपासून वक्तृत्व व शैक्षणिक सादरीकरण क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, यापूर्वीही तिने विविध मंचांवर आपली उत्तम भाषणशैली आणि विश्लेषण क्षमता सिद्ध केली आहे.

या यशामुळे अहिल्यानगर शहराचा अभिमान वाढला असून, तिच्या कुटुंबीयांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. रीत मेहेरच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करताना तिच्या मेहनतीचा, सातत्याचा आणि आत्मविश्वासाचा उल्लेख केला. रीत मेहेरचे हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, कठोर परिश्रम, अभ्यासपूर्ण दृष्टिकोन आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर राष्ट्रीयस्तरावरही यश मिळवता येते, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे.

## मनूबाई पाचपुते यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - काष्टी येथील रहिवासी मनूबाई हरिभाऊ पाचपुते (वय ९४) यांचे ३ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर घोडनदी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. जालिंदर, मोहन यांच्या त्या मातोश्री तर अनिल पाचपुते यांच्या आजी होत.

## हरिभाऊ मार्कंडे यांचे दुःखद निधन

नगर - राहुरी सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त कार्यकारी संचालक व कडा येथील शेतकरी कृषी तज्ञ व सहकार तज्ञ हरिभाऊ मार्कंडे (वय ७९) यांचे २ फेब्रुवारीला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. कृषी क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी प्राप्त असल्याने त्यांना परिसरात कृषी तज्ञ म्हणून ओळखले जात होते.



## अरुण अष्टेकर यांचे दुःखद निधन

नगर - भूतकरवाडी येथील आराधना स्टेट बँक कॉलनी येथील रहिवासी अरुण राधाकृष्ण अष्टेकर (वय ८३) यांचे १ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. देवदत्त अष्टेकर यांचे ते वडील होत. स्टेट बँकेचे ते सेवानिवृत्त कर्मचारी होत.



## सुरेश अष्टेकर यांचे दुःखद निधन



नगर - तोफखान्यातील फासेगल्ली येथील रहिवासी सुरेश सोन्याबापू अष्टेकर (वय ८२) यांचे ३ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## महादेव हजारे यांचे दुःखद निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी महादेव लाला हजारे (वय ७८) यांचे २ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३ फेब्रुवारी रोजी चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुरेश आवारी यांचे दीर्घ आजाराने निधन

नगर - अकोले येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार सुरेश भाऊराव आवारी (वय ७४) यांचे २ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३ फेब्रुवारी रोजी त्यांचे मुळ गाव इंदोरी (ता.अकोले) येथे प्रवरातिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ भाऊ, २ बहिणी, जावई, भाचे, नातवंडे असा परिवार आहे. दिपाली जाधव, दिशा कुरुडकर यांचे ते वडील तर पत्रकार हेमंत आवारी, सुजाता फापाळे, सुविधा काकड यांचे बंधू होत.


फोटो ओळी - देहरे टोलनाक्याजवळ गहू लुटणाऱ्या टोळीला पकडल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# चालकाचे हात पाय बांधून ट्रकमधील गव्हाचे पोते लुटणारे ४ आरोपी पकडले

## ३५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर - मध्यप्रदेश येथून गहू घेवून सोलापूर कडे जाणाऱ्या ट्रकचालकाला नगरमनमाड रोडवरील देहरे टोलनाक्याजवळ अडवून त्याचे हातपाय बांधून ट्रक मधील ९ लाख ६७ हजार २०० रुपये किंमतीच्या गव्हाच्या ९५३ गोण्या दुसऱ्या ट्रक मध्ये भरून लुटून नेणाऱ्या ४ जणांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्या कडून लुटलेला गहू व मालट्रक असा ३५ लाख ४० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

लुटीची ही घटना २७ जानेवारीला रात्री ८.३० च्या सुमारास घडली होती. या लुटारूंनी ट्रकचालक जगदीश चतुर्भुज माळी (रा. मंदसौर, मध्यप्रदेश) याला व क्लीनर ला पाथर्डी तालुक्यातील निवडुंगे शिवारात सोडून दिले होते. २८ जानेवारीला माळी याने एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात ४ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, संदीप मुरकुटे, महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार शाहिद शेख, गणेश धोत्रे, विष्णु भागवत, विजय पवार, दिपक घाटकर, फुरकान शेख, राहुल डोके, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले, विशाल तनपुरे, रमिझराजा आतार, प्रशांत राठोड, अरुण मोरे, भगवान धुळे, उत्तरेश्वर मोराळे यांची ३ वेगवेगळी पथके तयार करून या गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला.

या पथकांनी तात्काळ घटनाठिकाणी भेट देवुन आरोपीचे गुन्हा करण्याची पध्दत तसेच व्यावसायीक कौशल्याचे आधारे आरोपींची माहिती काढत असतांना पथकास सदरचा गुन्हा हा अर्जुनसिंग सरदार (रा. कोलारस, जि. शिवपुरी) व त्याचे साथीदारांनी केल्याची माहिती मिळाली. सदर माहितीचे आधारे आरोपींचा मध्यप्रदेश राज्यामध्ये शोध घेत असतांना सदरचे आरोपी हे शिवपुरी मध्यप्रदेश येथुन पुणे या ठिकाणी जाणार असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने आरोपींच्या ट्रकचा पाठलाग करुन सदरची ट्रक (क्र. आर. जे. ११ जी. सी. २७०४) ही अरणगांव परिसरामध्ये ताब्यात घेतली.

सदर ट्रकमध्ये अर्जुनसिंग नारायणसिंग सरदार (वय ४१), सागरसिंग गुरजंदसिंग सरदार (वय ४४, दोघे रा. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश) हे मिळून आले. त्यांच्याकडे सखोल व बारकाईने चौकशी केल्यावर त्यांनी साथीदार कल्ला शब्बीरा कोहरी (वय २५, रा. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश), रतीलाम मदनलाल कोहरी (वय ४०, रा. सबालगड, जि. मुरैना, मध्यप्रदेश) यांचेसह केल्याची कबुली दिली. त्यानंतर सदर आरोपींनाही ताब्यात घेण्यात आलेले आहे.

आरोपींनी चोरी केलेला गहु विकण्याचे दृष्टीने दुसरे प्लॅस्टीक बारदाना खरेदी करुन चोरीचा गहु सदर बारदानामध्ये भरलेला असुन आरोपींकडुन एकुण १० लाख ४० हजार रुपये किमतीचा ४७५ गोण्यामध्ये भरलेला एकुण २६ टन गहु, २५ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकुण ३५ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या आरोपींना गुन्ह्याचे पुढील तपासकामी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे मुद्देमालासह हजर करण्यात आले आहे.

# कट मारल्याच्या कारणावरून रिक्षाचालकास बेदम मारहाण

नगर - रिक्षाला कट मारल्याच्या कारणावरून ३-४ जणांच्या टोळक्याने एका रिक्षाचालकास लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना शेंडी बायपास चौकाजवळ ३० जानेवारी रोजी दुपारी २ च्या सुमारास घडली. या प्रकरणी २ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आकाश सुदाम गाडे (वय २८, रा. वडगाव गुप्ता) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या रिक्षामध्ये प्रवासी घेऊन बायपास रोडने जात होते. दुपारी पावणेतीन वाजेच्या सुमारास शेंडी चौक भागात आरोपी फैजान बागवान, याकूब इस्माईल (दोघे रा. मुकुंदनगर) आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर तीन ते चार अनोळखी व्यक्तींनी गाडीला कट मारल्याच्या कारणावरून आकाश यांच्याशी हुज्जत घातली.

वादाचे स्वरूप वाढल्याने आरोपींनी आकाश यांना अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले. 'जर पोलिसांत तक्रार केली तर गाठ आमच्याशी आहे,' अशी धमकी देऊन आरोपी तिथून पसार झाले. या घटनेनंतर गाडे यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी फैजान बागवान, याकूब इस्माईल (दोघे रा. मुकुंदनगर) आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर तीन ते चार अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोंढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## तबला वादन विशारद प्रथम परीक्षेत अहिल्यानगरचा सोहम भोसले उत्तीर्ण

नगर - नोव्हेंबर डिसेंबर २०२५ या सत्रात अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेमध्ये तबला वादन या विषयात विशारद प्रथम मध्ये सोहम भोसले याने उल्लेखनीय यश संपादन केले.



सोहम याला शिवरंजन संगीतालयाचे संचालक सुरज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. जाधव मळा भागातील रिक्षा चालक प्रवीण भोसले यांचा सोहम हा मुलगा आहे.

# कत्तलीसाठी चालविलेल्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका; ३९ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - कत्तलीसाठी चालविलेल्या १३ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका केली आहे. या कारवाईत ४ आरोपींना पकडून त्यांच्या कडून ३९ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे ३ फेब्रुवारी रोजी पहाटे ही कारवाई करण्यात आली.



पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेने गोवंशीय जनावरांची कत्तल रोखण्यासाठी व्यापक मोहीम सुरु केलेली आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार अतुल लोटके, दिपक घाटकर, सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, योगेश कर्डीले, किशोर शिरसाठ यांचे पथकनेवासा तालुक्यामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करणारे इसमांची माहिती काढत होते. या पथकाला ३ फेब्रुवारी रोजी पहाटे कृष्णानगर, घोडेगांव (ता. नेवासा) या ठिकाणी काही इसमांनी गोवंशीय जनावरे खरेदी करुन आणलेले असुन ते वाहनामध्ये भरुन कत्तलीसाठी नेणार असल्याची माहिती मिळाली.

ही माहिती मिळताच पथक तात्काळ त्या ठिकाणी पोहचले असता काही इसम हे मातीच्या ढिगाऱ्यावरुन गोवंशीय जनावरे ट्रकमध्ये भरतांना दिसुन आले. पथकाने सदर ठिकाणी असलेल्या रशिद जानुभाई शेख (वय ६५, रा. घोडेगांव, ता. नेवासा), अमीन इसाक सय्यद (वय ३०, रा. लोहगांव, ता. नेवासा), लाला उर्फ आफताब हारुन शेख (वय २६, रा. घोडेगांव, ता. नेवासा), शुभम बाबासाहेब पुंड (वय २६, रा. माळीचिंचोरा, ता. नेवासा) यांना पकडले. त्यांच्या ताब्यातून ९ लाख १० हजार रुपये किंमतीची १३ गोवंशीय जनावरे, ३० लाख रुपये किमतीची टाटा कंपनीची ट्रक (क्र.एम.एच. ४६, ए. आर. ६३८५) असा एकुण ३९ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द सोनई पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५, (अ), ५ (ब), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविणेचे कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, सावेडी यांच्या वतीने दासनवमी उत्सवानिमित्त श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सकाळी स्पर्धेचे उद्घाटन झाले. शहरातील विविध भागांतील तब्बल ३५ संघांनी सहभाग नोंदवून या स्पर्धेला प्रतिसाद दिला.

# सूर्यनमस्कार हा केवळ व्यायाम नसून सशक्त जीवनाचा आधार

## श्रीपाद कुलकर्णी यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमी उत्सवानिमित्त सूर्यनमस्कार स्पर्धा उत्साहात

नगर – आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. सूर्यनमस्कार हा केवळ शारीरिक व्यायाम नसून तो शरीर, मन आणि विचार यांचा समतोल राखणारा जीवनमार्ग आहे. विद्यार्थ्यांनी रोजच्या दिनक्रमात सूर्यनमस्काराचा समावेश केल्यास आत्मविश्वास वाढेल, आरोग्य सुदृढ राहील आणि सकारात्मक विचारांची जडणघडण होईल, असे संस्थेचे व्हा. चेअरमन तथा दासनवमी उत्सव समिती प्रमुख श्रीपाद कुलकर्णी यांनी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले. तसेच दास नवमीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शिस्त, सेवाभाव आणि सातत्य या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, सावेडी यांच्या वतीने दासनवमी उत्सवानिमित्त श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सकाळी स्पर्धेचे उद्घाटन झाले. शहरातील विविध भागांतील तब्बल ३५ संघांनी सहभाग नोंदवून या स्पर्धेला प्रतिसाद दिला.

दासनवमीच्या पावन पर्वाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक विकासावर भर देण्यात आला. सूर्यनमस्काराच्या माध्यमातून आरोग्य, शिस्त, एकाग्रता व सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देण्याचा उद्देश या स्पर्धेतून साध्य करण्यात आला. सहभागी संघांनी एकसंध, तालबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार सादर करत उपस्थितांची विशेष दाद मिळवली. संपूर्ण परिसर योगमय आणि प्रेरणादायी वातावरणाने भारावून गेला होता.

यावेळी शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, सेक्रेटरी सुरेश शिरसागर, संस्थेचे कार्यकारणी सदस्य स्वप्निल कुलकर्णी, सुनील जोशी, सौ. संध्या कुलकर्णी, संजय कुलकर्णी, प्राचार्या सौ. वसुधा जोशी, मुख्याध्यापक सुनील कानडे, मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापक अजय महाजन, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संकेत शिंदे यांनी केले. क्रीडा शिक्षक लोंढे सर यांनी उपस्थित सहभागी संघ, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अद्वैत साम्यभाव

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

आध्यात्मिक साम्यभावात भेद मावळणे आणि अभेदत्व उभे राहणे हेच भक्तिमार्गाचेही प्रयोजन ठरते आणि आध्यात्माची सिद्धता ! तर द्वैत सोडणे आणि अद्वैत मोडणे हे परमार्थाचेही प्रयोजन ठरते. भक्तिची अवस्था ही अद्वैती परमानंदी अशी आहे.

हाचि परमानंद आलंगीन बाही। तो क्षेम देता ठायी द्वैत तुटे ।

तो या परमानंदाला आपल्या बाहंनी आलिंगन देतो आणि आलिंगन दिले की द्वैत नाहीसे होते. परमानंदी आलिंगन हे ब्रह्मभावाचे लक्षण ठरते. ज्ञानदेवांनी ब्रह्मभावाला गेलेल्या श्रेष्ठ भक्ताचे लक्षण सांगताना ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात म्हटले आहे,

जो आत्मलाभासारिखे ।
गोमटे कांहीचि न देखे ।
म्हणौनी भोग विशेखे।
हरिखेजेना । १२/१९०

इथे ज्ञानदेवांनी आत्मलाभ हा शब्द ब्रह्मप्राप्ती या अर्थाने वापरला आहे. गीतेच्या बाराव्या अध्यायातील 'यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।' आणि 'समः शत्रौच मित्रेच' या दोन श्लोकांत ज्ञानेश्वर माउलींनी भाष्य करताना ज्या ओव्या लिहिल्या आहेत त्यातील अनेक ओव्या या समभावाचे दर्शन घडविणाऱ्या आहेत.

प्रस्तुत ओवीतून ज्ञानदेव सांगतात की ज्याला आत्मलाभ झाला आहे. ब्रह्मप्राप्ती झाली आहे, जो ब्रह्मरूपाने आपणच विश्व झाला आहे, ज्याचा जीव जीवातील, जीव जडातील, जीव ईश्वरातील आणि ईश्वर जडातील भेदभाव सहज गेलेला आहे आणि ब्रह्मप्राप्तीमुळे जो अभेदरूपाने वावरतो आहे तो 'भोग विशेखे हरिखेजेना', सामान्य भोगप्राप्तीने काय आनंदित होणार? तो विषयभोगाच्या केव्हाच पलीकडे गेलेला आहे. तो समत्वदर्शी झाला आहे. असा ब्रह्मभाव येण्यासाठी काही अवस्था आहेत. पहिली आहे द्वैतभाव, नंतर जीवऐक्यभाव, नंतर जीवशिवऐक्यभाव आणि ब्रह्मभाव. सूर्याच्या ठिकाणी अंधार व दिवस हे दोन्ही जसे संभवत नाही त्याप्रमाणे त्या भक्ताच्या ठिकाणी चांगल्या-वाईट कर्माचे किंवा भोगाचे संस्कार उमटत नाहीत. तो शुद्ध ज्ञानरूप होऊनच राहिला आहे. ज्ञानदेव अद्वैत भक्तिचाच पुरस्कार करतात. नव्हे तर तिलाच ज्ञानभक्ती असेही म्हणतात. योगमार्गाला भक्ती आणि भक्तिमार्गाला ज्ञान तर ज्ञान आणि योगमार्गाला पुन्हा भक्तिची जोड देऊन आध्यात्माला सामाजिकतेच्या अंगाने पुढे नेऊन अद्वैती साम्यभावच उभा करतात.

**– किशोर गांधी**

# बलात्कार प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता

नगर – कर्जत पोलीस ठाण्याच्या ऑगस्ट २०१७ ला दाखल झालेल्या बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपी सचिन दिलीप जंजिरे व दिलीप गेना जंजिरे यांची श्रीगोंदा अतिरिक्त सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आली आहे, अशी माहिती ॲड. पृथ्वीराज डापसे यांनी दिली. या प्रकरणी फिर्यादीच्या कथनात विसंगती असून वैद्यकीय व वैज्ञानिक पुरावे अभियोजनाच्या कथनास पाठबळ देत नाहीत. तसेच तपास प्रक्रियेत त्रुटी असून आरोपींना खोट्या पद्धतीने गोवण्यात आले असल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वतीने ॲड. पृथ्वीराज डापसे यांनी न्यायालयासमोर केला. या सविस्तर व ठोस युक्तिवादांचा न्यायालयाने सखोल विचार केला.

श्रीगोंदा न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. शिंगाडे यांनी सविस्तर पुराव्यांचे मूल्यमापन करून या प्रकरणी नुकताच निकाल दिला आहे. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, फिर्यादी पक्ष आरोपींविरुद्ध दोष संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे तसेच रासायनिक विश्लेषण अहवाल यामध्ये आवश्यक ते ठोस व विश्वासार्ह समर्थन आढळून आले असल्याने त्यांनी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता करून त्यांच्यावर लादलेले सर्व आरोप फेटाळण्यात आले आहेत. आरोपी जंजिरे यांच्यावतीने विधी कामकाज ॲड. पृथ्वीराज संदीप डापसे यांनी केले. त्यांना ॲड. मुस्कान सय्यद, ॲड. तेजस कोल्हे, ॲड. अमोल शेळके व चिराग दिसेजा यांनी सहाय्य केले.

# मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना एम्प्लिफायरची मदत



सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांसाठी उपयुक्त ठरणारे एम्प्लिफायर भेट देण्यात आले. यासोबतच विद्यार्थ्यांना चॉकलेट व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

नगर – सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांसाठी उपयुक्त ठरणारे एम्प्लिफायर भेट देण्यात आले. यासोबतच विद्यार्थ्यांना चॉकलेट व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम प्रकल्प प्रमुख रितू वधवा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमास सेवाप्रीत ग्रुपमधील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यामध्ये सेवाप्रीतच्या अध्यक्षा जागृती ओबेरॉय, ग्रुप लीडर अर्चना खंडेलवाल व गीता नय्यर, तसेच ग्रुपच्या सदस्या भावना सचदेव, गीत किंगर, जया गायकवाड, कविता दरंदले, कुसुम, मनीषा उल्हारे, माया मदान, मायाताई कोल्हे, मीरा बारस्कर, प्रतिभा भिसे, प्रीती धुप्पड, राजश्री पोहेकर, सुनिता आहुजा, श्वेता गांधी, सुमन कपूर, सुनीता बक्षी, सुनीता वर्मा, सुरेखा बारस्कर, स्वरण माखिजा, वंदना ठुबे, मिनाक्षी जाधव आदी महिला उपस्थित होत्या.

### सेवाप्रीतचे मूकबधिर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठबळ

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, अपंग संजीवनी सोसायटीमध्ये मूकबधिर विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना निवासाचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. समाजातील प्रत्येक घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षण व आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सेवाप्रीत सोशल फाउंडेशन सातत्याने योगदान देत आहे. शिक्षण हेच असे प्रभावी साधन आहे, जे या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करू शकते. मूकबधिर विद्यार्थी हेही समाजाचा अविभाज्य घटक असून, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे हास्य पाहिल्यावर आमच्या सर्व प्रयत्नांचे सार्थक झाल्याची भावना निर्माण होते. चांगले विद्यार्थी घडले, तर निश्चितच सक्षम भारत घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रकल्प प्रमुख रितू वधवा म्हणाल्या की, सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने यापूर्वीही दिव्यांग व मूकबधिर विद्यार्थ्यांच्या विविध संस्थांना अनेक प्रकारची मदत करण्यात आली आहे. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सादरीकरणे, कार्यक्रम व उपक्रमांसाठी उपयोगी ठरणारे एम्प्लिफायर प्रदान करण्यात आले असून, याचा त्यांना निश्चितच लाभ होणार आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सेवाप्रीतने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठबळाबद्दल अपंग संजीवनी सोसायटीच्या वतीने फाउंडेशनचे आभार व्यक्त करण्यात आले.

# धनादेश न वटल्याने आरोपीला कारावास व १.७० लाखांचा दंड

नगर – नगर शहरातील कल्पतरू मल्टीपर्पज को.ऑप.सो. या पतसंस्थेला परताव्या पोटी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी नगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी धनोज दत्तात्रय शिंदे यांना १ महिना कठोर कारावास व १ लाख ७० हजार रुपये दंड एक महिन्याच्या आत भरणे व दंड न दिल्यास ३ महिने अधिकचा कठोर कारावास अशी शिक्षा सुनावली. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८(२) नुसार नि.इ.कलम १३८ मध्ये आरोपीला दोषी धरण्यात आले आहे.

आरोपीने पतसंस्थेकडून मध्ये १,००,००० रुपये चे कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या रकमेचा परतावा म्हणून आरोपीचे खाते असलेल्या बंधन बँक, शाखा केडगाव, अहिल्यानगर चा १ लाख ५७ हजार २८७ रुपयांचा धनादेश फिर्यादीला दिला होता. तो फिर्यादी संस्थेने वटण्यास बँकेत भरला असता अनादरीत झाला. त्यानुसार फिर्यादीने न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. संस्थेच्या वतीने अशोक दत्तात्रय तांबे यांची साक्ष महत्वाची ठरली. प्रकरणात दाखल केलेला कागदोपत्री पुरावा व फिर्यादीच्या वतीने ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीस दोषी धरण्यात आले.

या कामी फिर्यादी संस्थेकडून ॲड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. गणेश शेटे, ॲड. आशिष जाधव, ॲड. जैद शेख यांनी सहकार्य केले.



श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा नवनाथ महाराजांची प्रतिमा देऊन अविनाश देडगांवकर यांनी नुकताच सत्कार केला. सत्कारप्रसंगी प्रा. माणिकराव विधाते, सुनील आरे, महात्मा विद्यार्थी वसतिगृहाचे अध्यक्ष गणेश कोरडे आदी उपस्थित होते.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या प्रकरणातून ५ जण निर्दोष

नगर – २६/०९/२०१६ रोजी पहाटे ४ वा. चे पुर्वी अहमदनगर शहरातील विद्या कॉलनी, आदर्शनगर, कल्याण रोड, फ्लॅट नं. १५५ पहिल्या मजल्यावर यातील मयत हि पतीकडे सन २०१० मध्ये विवाह होऊन नांदत असतांना तिने माहेरहून आई वडिलांकडून फ्लॅट घेण्यासाठी रुपये १० लाख आणले नाही, या कारणाहुन आरोपी क्र. १ पांडुरंग घनः शाम बडे (पती), २. यमुनाबाई घनःशाम बडे (सासू), ३. घनःशाम भोंजी बडे (सासरा), ४. परमेश्वर घनःशाम बडे (दिर), ५. आशाबाई बाबासाहेब बडे (नणंद) यांनी संगनमत करुन मयताचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने तिने तिचे राहते घरात ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. म्हणून मयताचे वडिलांनी दाखल केलेल्या फिर्यादीहुन वरील आरोपींचे विरुध्द कोतवाली पोलिसांनी भा.दं. वि. कलम ३०६, ४९८अ, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असता, त्याची चौकशी येथील जिल्हा न्यायालयात होऊन सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

आरोपीतर्फे बचाव घेण्यात आला की, आरोपी क्र. १ हा प्रादेशिक परिवहन खात्यात नोकरीस असून तो २०१३ मध्ये नागपुर येथे कार्यरत होता. तेथे मयत पत्नी व ते दोघे राहत होते. तेंव्हा आरोपी क्र. १ याने फिर्यादीस गरज असल्याने रुपये पन्नास हजाराची ऑनलाईन रक्कम पाठवून मदत केली होती. आरोपी याला फिर्यादीची परिस्थिती गरीबीची आहे याची कल्पना होती. उलट आरोपी नंबर १ हाच फिर्यादीस आर्थिक मदत करत होता. त्यामुळे त्याने कधीही रु. १० लाख मागितले नाही. तसेच बदली नागपुर येथून श्रीरामपुर येथे झाली परंतू मुलाच्या शिक्षणासाठी त्याने पत्नी व मुलास नगर येथे ठेवले होते व तो शनिवार, रविवार नगर येथे येत असे. पत्नी त्यास श्रीरामपुर येथे नेण्यासाठी तगादा करत होती. परंतू आरोपी म्हणत असे नगर येथे शिक्षण चांगले आहे म्हणून तिला श्रीरामपुर येथे घेऊन जाण्यास तयार नव्हता. पत्नीने हट्ट केला त्यामुळे तिने आत्महत्या केली असावी, तिला कोणताही त्रास नव्हता व त्यांनी कधीही पैशाची मागणी केली नाही. हा बचाव ग्राहय धरण्यात आला. आरोपीतर्फे ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या कासम शहावली बाबांचा संदल व उरूस



नगर – हिंतमपुरा चौक येथील हाजी सय्यद सुलतानुद्दीन शहावली उर्फ कासम शहावली बाबा यांच्या दर्ग्याचा वार्षिक संदल व उरूस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या उरूस निमित्ताने भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मुजावर कैसरभाई सय्यद यांनी केले आहे.

कासम शहावली बाबा दर्गा हे हिंदू-मुस्लिमसह सर्वधर्मीय भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे दरवर्षी उत्साहात उरूस साजरा केला जातो. यावर्षीच्या उरूस कार्यक्रमाची सुरुवात ५ फेब्रुवारी रोजी कुराणखाणीने होणार आहे. त्यानंतर ६ फेब्रुवारी रोजी संदल शरीफ, तर ७ फेब्रुवारी रोजी मुख्य उरूस सोहळा पार पडणार आहे.

उरूसनिमित्त ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लंगर (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे. तसेच रात्री ८ वाजता भाविकांसाठी कव्वालीचा कार्यक्रम होणार असून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन मुजावर कैसरभाई सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून उरूस कमिटी सदस्य कैसरभाई सय्यद, बाळासाहेब घोरपडे, नारायण हरबा, सलीम शेख, संजूभाई जगताप, विशाल भिंगारदिवे, योगेश काशीद, उद्धव बारस्कर, दत्तू वाघ, पप्पू भिंगारदिवे, पोपट जाधव, सुजय म्हस्के आदींनी भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# कापडगाव ते शिर्डी दिंडीचे अहिल्यानगर येथे स्वागत



कापडगाव ते शिर्डी पायी दिंडीचे अहिल्यानगर येथे स्वागत करण्यात आले.

नगर – कापडगाव पंचक्रोशी ते शिर्डी पायी दिंडीचे अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर मनमाड रोड विळद येथे ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या वतीने भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. दिंडीचे स्वागत करताना संपूर्ण परिसर ओम साई रामच्या गजराने दुमदुमून गेला.

भिंगार येथील ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने विळद येथे आयोजित करण्यात आलेल्या स्वागत सोहळ्यात फाऊंडेशनचे संचालक प्रविण साळवे यांनी दिंडी प्रमुखांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते. या दिंडीत विनेकरी ह.भ.प. दादासाहेब नाना शिंदे, तुळशीवाल्या सौ. सिंधुताई दादा शिंदे, चोपदार जाधव महाराज, रथचालक पडळकर महाराज, तसेच प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प. बाळासाहेब महाराज शिंदे (लोणंद) व त्यांचे सर्व सहकारी सहभागी झाले होते. यासोबतच कापडगाव, पाडेगाव येथील ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील वारकरी उपस्थित होते.

कापडगाव (ता. फलटण, जि. सातारा) येथून निघालेली ही दिंडी एकूण नऊ दिवसांत २४० किलोमीटरचा पायी प्रवास करीत शिर्डीकडे मार्गस्थ आहे. दिंडीचे प्रमुख व दिंडी चालक ह.भ.प. राजेंद्र महाराज आचपळ असून, व्यवस्थापनाची जबाबदारी पांडुरंग पोपट केंजळे, विशाल शिंदे (शिंदेमाळ), दुर्गामाता चॅरिटेबल फाऊंडेशन संचालक व इतर सहकारी सांभाळत आहेत. या दिंडीत एकूण ४६ महिला व पुरुष वारकरी सहभागी आहेत.

प्रवासाच्या सहाव्या दिवशी दिंडी नगर-मनमाड रोड विळद येथे पोहोचताच वारकऱ्यांचे टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. या स्वागत सोहळ्याचे आयोजन ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या संचालिका सौ. सुप्रिया चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

प्रवीण साळवे म्हणाले की, वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची अध्यात्मिक ओळख आहे. पायी दिंडी ही केवळ यात्रा नसून ती सामाजिक एकतेचा संदेश देते. कापडगाव ते शिर्डी असा तब्बल २४० किलोमीटरचा पायी प्रवास करत वारकरी ज्या निष्ठेने आणि श्रद्धेने वाटचाल करीत आहेत, ती आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्या वतीने या वारकऱ्यांचे स्वागत करण्याचा आम्हाला अभिमान वाटतो. समाजात संस्कार, अध्यात्म आणि सामाजिक सलोखा जपण्याचे कार्य वारकरी संप्रदाय सातत्याने करीत असल्याचे ते म्हणाले.

# नाम हे सत्कर्माचा पाया व कळस : लक्ष्मण महाराज नांगरे

## शिलाविहारला गोंदवलेकर महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या सप्ताहाची सांगता दहीहंडी फोडून काढण्यात आली. (छाया – विजय मते)

नगर – मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो तरी ते नाम घेत राहिल्याचे सत्कृत्य पदरात पडते, इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यामध्ये हाच मोठा फरक आहे. इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते. नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाही. त्यामुळे नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा नाही हा प्रश्न उद्भवत नाही.नाम मुखी आले की सत्कर्म होऊच लागतात. नाम हेच सत्कर्माचा पाया आहे तसाच कळस ही आहे.असे निरूपण कीर्तनकार हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांनी केले.

सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे किर्तन होऊन दहीहंडी फोडून करण्यात आली. याप्रसंगी नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, आकाश त्र्यंबके, माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, माऊली गायकवाड, बिभीषण अनभुले, सुंदरदास रिंगणे, प्रसाद रिंगणे, सेवाभावी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

हभप नांगरे महाराजांनी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे जीवन संपूर्ण राम नामात कसे गेले, त्यांचे चरित्र ग्रंथातील महत्व विशद करून नामाचे महत्त्व सांगितले. नाम घेणाऱ्याला सत्कर्म टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्म फळाला आली असे केव्हा म्हणता येईल तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच ते फळाला आली असे समजा.तेव्हा नामाचा ध्यास धरा, नामाशिवाय जगणे खरे नाही असे वाटले की नामावरती निष्ठा वाढते. तेव्हा रामनामाचे स्मरण करा, असे आवाहन त्यांनी केले.

या अखंड हरिनाम सप्ताहात श्रीमद देवी भागवत कथा डॉ.अनिकेत घोटणकर यांनी सांगितली. यावेळी कुमारिका पूजन, कुंकुमार्चन असे कार्यक्रम पार पडले. कथा ऐकण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. देवी भागवत कथेच्या समारोपप्रसंगी दीप प्रज्वलानाने महाआरती करण्यात आली.

या सप्ताहामध्ये पहाटे रुद्राभिषेक ग्रंथ वाचन भजन आरती महाप्रसाद हरिपाठ पंचपदी भजन असे धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. यासाठी हभप गंगाधर झाडे, महाराज हभप कृष्णा रायकर महाराज, पंडित महाराज, दिलीप पुंड, सखाराम पंडित यांचे सहकार्य लाभले.

श्री ब्रह्मचैतन्य गोंधळेकर महाराज यांचा जन्मोत्सव झाल्यावर काल्याचे किर्तन आणि दहीहंडी फोडून सप्ताहाची सांगता झाली महाप्रसादासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी सेवाभावी मंडळाचे सुदर्शन अडसुरे, विकास बोरुडे, लहू बडे, राहुल लिमये, अनिल गाडे, उमेश पठारे, भैय्या डहाळे, पार्श्वनाथ औटी सेवेकरी आदींनी परिश्रम घेतले. सौ.रेखाताई रिंगणे यांनी आभार मानले.

### डॉ. बोरा क्लिनिकतर्फे ९ ते १३ फेब्रुवारी दरम्यान

# अहिल्यानगरमध्ये थायरॉईड रुग्णांसाठी होमिओपॅथी उपचार शिबिराचे आयोजन

नगर – थायरॉईड रुग्णांसाठी होमिओपॅथी उपचार शिबीर अहिल्यानगर येथील डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक आयोजित ९ ते १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते २ व संध्याकाळी ५ ते ८ पर्यंत डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक, नक्षत्र मेडीकल मागे, बुरुडगाव रोड, चाणक्य चौक, अहिल्यानगर येथे थायरॉईड रुग्णांसाठी होमिओपॅथी औषधोपचार केले जाणार आहे, अशी माहिती डॉ. प्रतिमा बोरा यांनी दिली.

अधिक माहिती देतांना डॉ. प्रतिमा बोरा म्हणाल्या, हे होमिओपॅथी शिबीर ज्यांना अनेक वर्षापासुन थायरॉईडवर औषधे चालू आहेत, परंतु थायरॉईड कमी होत नाही वर्षानुवर्ष औषधे चालु आहे पण फरक पडत नाही. तसेच ज्यांना पुढील लक्षणे दिसत असतील वजन वाढणे किंवा कमी होणे, मासिक पाळीच्या तक्रारी, चक्कर येणे, केसांच्या तक्रारी, सांधेदुखी, वंध्यत्व येणे, झोपेच्या तक्रारी, इतरांपेक्षा अधिक घाम येणे, थायरॉईड ग्रंथीचा आकार वाढणे, काही गोष्टी लक्षात न राहणे, इत्यादी लक्षणे असल्यास त्यांनी हया शिबीराचा लाभ घ्यावा.

रुग्णांची सर्व माहिती घेऊन त्यावर होमिओपॅथी उपचार करण्यात येतील. रुग्णांना होमिओपॅथी उपचार फक्त ३०० रुपयामध्ये एका महिन्याची औषधे दिली जाणार आहे. तसेच ज्या रुग्णांना रक्त तपासणी (T3, T4, TSH) करायची असेल त्यांना फक्त २०० रुपया मध्ये करण्यात येईल.

होमिओपॅथी औषधाचे दुष्परिणाम होत नाहीत व काही दिवस होमिओपॅथी उपचार घेतले. तर थायरॉईडवर मात करता येईल व आयुष्यभर औषध घेण्याचे बंद होतील.

शिबीराचे होमिओपॅथी उपचाराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या थायरॉईडच्या रूग्णांची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच बाहेर गावावरून येणा–या रूग्णांना पुढील औषधे कोरीयरने पाठविले जातील.

रूग्णांनी येताना थायरॉईचे निदान झाल्यापासूनचे सर्व रिपोर्टस सोबत आणावेत. यासह इतर कोणतेही उपचार सुरू असलेले रूग्णही या शिबीरामध्ये येऊन होमिओपॅथी औषधोपचार घेऊ शकतात. होमिओपॅथी औषधोपचार नियमीत घेतल्यास त्याचा परिणाम लवकर दिसुन येतो.

अधिक माहिती आणि नाव नोंदणीसाठी डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक नक्षत्र मेडीकल मागे, बुरुडगाव रोड, चाणक्य चौक अहिल्यानगर किंवा ९८२२६४६५८८ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन डॉ. बोरा यांनी केले आहे.

# योग्य उपचारांसह शस्त्रक्रियाद्वारे महिलांच्या 'गर्भाशयमुखाचा कॅन्सर' बरा होऊ शकतो


डॉ. सतीश सोनवणे

नगर – भारतीय महिलांमध्ये दरवर्षी सव्वा लाख स्त्रियांना गर्भाशयमुखाचा कॅन्सर होतो. योग्य निदान न झाल्यामुळे व योग्य उपचार न घेतल्यामुळे किमान ५० हजार स्त्रीया या रोगामुळे मृत्युमुखी पडतात. या आजाराबाबत महिलांमध्ये योग्य जागृती निर्माण झाली तर अनेक महिलांना जीवदान मिळू शकेल असा विश्वास मॅककेअर हॉस्पिटलचे संचालक व कॅन्सर तज्ञ डॉ. सतीश सोनवणे यांनी व्यक्त केला.

जागतिक आरोग्य संघटना व आंतरराष्ट्रीय जागतिक कॅन्सर विरोधी संघटनेच्या वतीने जगभरात ४ फेब्रुवारी हा कॅन्सरबाबत जनजागृती दिन म्हणून साजरा केला जातो. याबाबत कॅन्सर सर्जन डॉ. सोनवणे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, लहान वयात लैंगिक संबंध, अल्पवयीन मुलींचा विवाह, वयाच्या २० वर्षाअगोदर पहिली गर्भधारणा, तीनपेक्षा अधिक वेळा गर्भधारणा किंवा दोन गर्भधारणांमध्ये कमी अंतर (यामुळे गर्भाशयमुखाला वारंवार इजा होते व ती जखम भरण्यास अवधी मिळत नाही), गुप्तांगाची अस्वच्छता, तंबाखूची व्यसनाधिनता अशा प्रकारच्या कारणामुळे गर्भाशय मुखाचा कॅन्सर होतो.

गर्भाशयमुखाच्या कॅन्सरचे निदान बहुतांशी स्त्रियांमध्ये वयाच्या ३५ ते ५५ मध्ये होते, परंतु त्यांच्यामध्ये एच पी व्ही चा संसर्ग हा तारुण्यामध्येच झालेला असतो. अनेक स्त्रियांमध्ये गर्भाशयमुखाच्या कॅन्सरची कोणतीही लक्षणे सुरुवातीच्या काळात दिसत नाहीत. हा आजार गंभीर अवस्थेत गेल्यानंतरच कळतो. पोट उघडून गर्भाशयाची पिशवी, पॅरामेट्रियम, योनी मार्गाचा काही भाग व लसिका ग्रंथी शस्त्रक्रिया करून काढण्यात येते. आजाराचे प्रमाण जास्त असल्यास किमोथेरपी व रेडिएशनचाही विचार केला जातो.

**गर्भाशयमुखाच्या कॅन्सरची लक्षणे** – दोन मासिक पाळी दरम्यान रक्तस्त्राव होणे, लैंगिक संबंधानंतर रक्तस्त्राव, पाळी बंद झाल्यानंतर (रजोनिवृत्तीनंतर) होणारा रक्तस्त्राव, योनीमार्गातून अनियमित आणि अतिरिक्त स्त्राव, असाधारण थकवा, अशक्तपणा, वजन कमी होणे. ही याची लक्षणे आहेत.कापसाचा बोळा किंवा ब्रशच्या सहाय्याने गर्भाशयमुखातील पेशी काचपट्टीवर घेऊन सुक्ष्मदर्शकाखाली पॅप टेस्ट करून गर्भाशय मुखाच्या कॅन्सर बाबत निदान केले जाते.

**गर्भाशयाच्या कॅन्सरचा धोका कसा टाळावा?**
– वयाच्या तीशीनंतर पॅप टेस्ट करावी, अठरा वर्षानंतरच लग्न करावे. कुटुंब नियोजन करून पहिला मुलाचा जन्म वयाच्या २० वर्षानंतरच होईल याची खबरदारी घ्यावी. वारंवार गर्भधारणा टाळाव्यात. योगीमार्ग व जननेंद्रियांची स्वच्छता ठेवावी. जीवनशैलीतील काही हितकारक बदल, अल्पवयात व एकापेक्षा अधिक व्यक्तींशी लैंगिक संबंध टाळावेत, तंबाखूचे सेवन टाळणे. गर्भाशय मुखाचा कॅन्सर आणि लसीकरण करावे. नऊ ते ४५ वयोगटातील मुली व महिला लसीकरण करू शकतात.

स्त्रियांकडून पाळली जाणारी वैयक्तिक स्वच्छता व आरोग्याबाबत त्यांच्यामध्ये झालेली जागृती यामुळे गर्भाशयमुखाच्या कॅन्सर आजाराचे प्रमाण कमी होत आहे. आपल्या देशासाठी ही अतिशय सकारात्मक बाब असली तरी स्त्रियांमध्ये याबाबतची काही लक्षणे आढळल्यास तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी. असे ही कॅन्सरतज्ञ डॉ. सतीश सोनवणे यांनी सांगितले.

# अहिल्यानगरमध्ये ४ फेब्रुवारीला कर्करोग दिनानिमित्त जबड्याचा व 'मुख कर्करोग निदान शिबीर'

नगर – जबड्याचे, गालाचे तसेच मुख कर्करोगाचे निदान करण्यासाठी व रुग्णांमध्ये कर्करोगासंदर्भात जनजागृती व्हावी या हेतूने जागतिक कर्करोग दिनानिमित्त जबड्याच्या व मुख कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे मुखशल्यचिकित्सक डॉ. सौ. चैताली सुदर्शन गोरे यांनी सांगितले.

GORE DENTAL HOSPITAL

जबड्याच्या व मुख कर्करोग निदान शिबिराचे आयोजन गोरे डेंटल हॉस्पिटल, डॉ. आंबेडकर रोड, माळीवाडा येथे ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत केलेले आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणीसाठी ९० २८ ३० ६० २० नंबर वर संपर्क करावा.

गोरे डेंटल हॉस्पिटल चे डेंटल सर्जन डॉ. सुदर्शन गोरे म्हणाले की वारंवार तोंड येणे, गालाला लाल चट्टे येणे, गालाला पांढरे चट्टे येणे, तिखट खाताना गालांची जळजळ होणे, वारंवार गालाला जखमा होणे, तोंड पूर्वीपेक्षा कमी उघडणे ही मुखाच्या व जबड्याच्या कर्करोगाची पूर्व प्राथमिक लक्षणे आहेत. याचे रुग्णांनी त्वरित निदान करून त्यावर उपचार करून घ्यावेत हा या शिबिराचा उद्देश आहे.

तसेच या शिबिरामध्ये आत्याधुनिक डेंटल ओपीजी स्कॅन मशीनद्वारे जबड्याच्या कॅन्सर चे निदान करण्याची सुविधा उपलब्ध आहे. रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर गोरे डेंटल हॉस्पिटल माळीवाडा यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# मानसिक आरोग्यावर ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान नगर शहरात तीन दिवसीय 'मोफत कार्यशाळा'

### मनरंग कौन्सिलिंग सेंटर व होलिस्टिक ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटरचा उपक्रम

नगर – मनरंग कौन्सिलिंग सेंटर, अहिल्यानगर व होलिस्टिक ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्यावर आधारित तीन दिवशीय मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ज्येष्ठ नागरिक, महिला, पालक, शालेय विद्यार्थी, युवक अशा सर्व वयोगटासाठीची आहे. ही कार्यशाळा ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान 'कम्युनिटी एम्पॉवरमेंट प्रोग्राम २.०' आयुर्वेद परिचय केंद्र हॉल, धन्वंतरी वनौषधी उद्यान, बालिकाश्रम रोड, धर्माधिकारी मळा, नायरा पेट्रोलपंपामागे, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार यांच्य हस्ते ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते ११.३० या वेळेत संपन्न होऊन त्यानंतर लगेचच मोफत कार्यशाळेस सुरुवात होईल. स. ११.३० ते १.३० 'असह्य ते सुसह्य' (उतारवयातील तणाव नियोजन), दु. ३.३० ते ५.३० 'मी आणि माझे मन' (महिलांचे मानसिक आरोग्य), सायं. ६.३० ते ८ 'विवेकी पालकत्व' (पालकांसाठी कार्यशाळा) होईल.

७ फेब्रुवारी रोजी स. १०.३० ते १२.३० 'भावनिक बुद्धीमत्ता कार्यशाळा' (किशोरवयीन मुलांसाठी), दु. २ ते ४ 'कर हर मैदान फतेह' (युवकांसाठी प्रेरणादायी), सायं. ५ ते ६ 'हे जीवन सुंदर आहे' या विषयावर सर्व वयोगटांसाठी सायकॉलॉजिस्ट वक्त्या नम्रता कंडोई मार्गदर्शन करतील, त्यानंतर गायिका सरोज पालडिया यांची सायं. ६.३० ते ८ 'रे मना' (मनावरील गाण्यांची गीत मैफल) कार्यक्रम होईल.

८ फेब्रुवारी रोजी स. १०.३० ते १ वाजेपर्यंत सर्व वयोगटांसाठी 'चक्र हिलिंग ॲण्ड मेडिटेशन'चा कार्यक्रम मोफत कार्यशाळेंतर्गत होईल. अधिक माहितीसाठी डॉ. सचिन साळवे यांचे मनरंग कौन्सिल सेंटर, अहिल्यानगर, मो. ९८२२२९१११८, ८७८८५८७१६० वर संपर्क साधावा.

मोफत कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

# आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या जिल्हा सचिवपदी डॉ. गणेश तनपुरे यांची निवड


आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या जिल्हा सचिवपदी डॉ. गणेश तनपुरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील आदी.

नगर – आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनच्या ॲक्युपंक्चर विभागाच्या अहिल्यानगर जिल्हा सचिव या पदावर डॉ. गणेश निवृत्ती तनपुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन ही संस्था संपूर्ण भारतात तसेच भारताबाहेरही आयुष चिकित्सा पद्धतींच्या प्रचार, प्रसार व संघटनासाठी कार्यरत आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे १ फेब्रुवारी रोजी आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र महाअधिवेशन उत्साहात पार पडले. या अधिवेशनात महाराष्ट्रातील आयुर्वेद, होमिओपॅथी, योगा, नॅचरोपॅथी, युनानी तसेच ॲक्युपंक्चर चिकित्सक उपस्थित होते.

अधिवेशनात आयुष चिकित्सेचा प्रभावी प्रचार–प्रसार, संघटन विकास व भविष्यातील दिशा यावर चर्चा करण्यात आली. याच वेळी संघटन बळकटीसाठी अनेक महत्वाच्या मुख्य पदांवर नवीन नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या, त्यामध्ये डॉ. गणेश निवृत्ती तनपुरे यांच्या निवडीचा समावेश आहे.

या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील, चेअरमन डॉ. सतीश कराळे, अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवठकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# नेत्रतज्ज्ञ डॉक्टर सुधा कांकरिया यांना 'महाराष्ट्राचे शिल्पकार' पुरस्कार प्रदान



नगर – येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. सुधा कांकरिया यांना महाराष्ट्राचे शिल्पकार हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार विनोदी अभिनेता आणि लेखक समिर चौगुले यांच्या हस्ते पुणे येथे रेडिओ ऑरेंज व्दारे देण्यात आला.

डॉ. सुधा कांकरिया यांचे कार्य दिशादर्शक व समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन करणारे असून महाराष्ट्राच्या विकास व उन्नतीसाठी त्यांनी आपल्या समाजकार्यातुन योगदान दिले आहे. स्त्री जन्माचे स्वागत, नेत्रदानाची चळवळ, पर्यावरण संवर्धनाचे मोलाचे कार्य, महिला सबलीकरण, ग्रामविकास, बालरंगभुमीची उत्तम सेवा, लेखन आणि काव्यनिर्मिती व्दारे साहित्यक्षेत्रातील सेवा, नकोशी नांवाच्या मुलींचे पुर्ननामकरण, आठवा फेरा स्त्री जन्माच्या स्वागताचा विषयीचा समाजउपयोगी नवीन पायंडा तसेच मन:शांतीसाठी राजयोगा मेडिटेशन या सर्व अभियानाव्दारे गेली ४० वर्षे पेक्षा जास्त कालावधीत डॉ. सुधाताई कांकरिया यांनी महाराष्ट्रासह देशात आपल्या कार्याचा उत्तम ठसा उमटविला आहे म्हणूनच त्यांना 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

डॉ. सुधा कांकरिया सर्वोच्च जागतिक सन्मान नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकित असुन 'बेटी बचाओ' आंदोलनाच्या आद्य प्रवर्तक डॉ. सुधा कांकरिया यांच्या कार्याची दखल देशाच्या सर्वोच्च पातळीवर घेण्यात आली आहे. सन २००७ मध्ये भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते निर्मलग्राम पुरस्कार तसेच २००८ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. युरोपमधील युनिव्हर्सिटी ऑफ माउंटन्स तर्फे डॉ. सुधाजी यांना 'वुमन एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. आजपर्यंत १५० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्या सन्मानित झाल्या आहेत. त्यांच्या महान सामाजिक कार्याची दखल थेट टपाल तिकिटही प्रकाशित झाले आहे. डॉ. सुधा कांकरिया यांच्या नावाचे स्वतंत्र डाक तिकीट प्रकाशित होणे हा अत्यंत गौरवाचा क्षण आहे.


'अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर' आणि संस्था ITC Sangeet Research Academy, कोलकत्ता यांच्या संयुक्त विद्यमाने विरासत या अभिजात शास्त्रीय संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

# तरुण पिढीच्या योगदानातून अहिल्यानगरच्या संगीत क्षेत्रात मोठी भर पडेल

### पं. ब्रजेश्वर मुखर्जी यांचे प्रतिपादन, अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर व ITC Sangeet Research Academy,Kolkata आयोजित विरासत मैफलीला रसिकांचा व संगीत साधकांचा प्रतिसाद



नगर – अहिल्यानगर शहरात कला, संगीत, संस्कृती यांचा अनाहत एक कलासृष्टी ही संस्था प्रचार आणि प्रसार करत असून, 'विरासत'सारख्या दर्जेदार कार्यक्रमांमुळे शहरातील सांस्कृतिक वातावरण तरुण पिढीच्या योगदानातून अधिक समृद्ध होईल असे प्रतिपादन कोलकता येथील शास्त्रीय गायक, गुरु पं. ब्रजेश्वर मुखर्जी यांनी केले.

'अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर' आणि संस्था ITC Sangeet Research Academy, कोलकत्ता यांच्या संयुक्त विद्यमाने विरासत या अभिजात शास्त्रीय संगीत मैफिलीचे आयोजन नुकतेच माऊली सभागृह येथे करण्यात आले होते. या विशेष संगीत मैफलीच्या पूर्वार्धात सतार वादक कल्याण मुजुमदार यांनी राग – बिहागने केली. विशेष आलाप, जोड, बंदिश, झाला हे प्रकार अत्यंत तयारीने सादर केले. तसेच राग – झिंझोटी मधील स्वरचित बंदिश सादर केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात शास्त्रीय गायक व गुरु पं. ब्रजेश्वर मुखर्जी यांनी राग – बागेश्रीने केली दमदार आवाज, विशेष लयकारी, तानांचे प्रकार सादर केले तसेच का करू सजनी ही ठुमरी, हे सुरांनो चंद्र व्हा हे नाट्यगीत, जो भजे हरी को सदा या भजनाने मैफलीची सांगता केली. या कार्यक्रमाला तबला आशय कुलकर्णी, संवादिनी – अमेय बिचू, तानपुऱ्यावर गणेश बैरागी यांनी समर्पक साथसंगत केली. या कार्यक्रमाची संकल्पना शास्त्रीय गायक अभिजित अपस्तंभ यांची होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक देव व प्रचिती सुवर्णपाठकी यांनी केले. तसेच ओंकार देऊळगावकर व अमृता बेडेकर यांनी कलाकारांचा परिचय करून दिला. ध्वनी व्यवस्था अवधूत गुरव यांची होती तसेच प्रकाश योजना अभिनंदन ढोरे व सोहम सौंदणकर यांनी केली. या कार्यक्रमाला आशिष नवले, विशाल मोरे, सौ. स्वस्तीश्री गरुड, ब्रिगेडियर चावला, अनिकेत दातीर, दिनकर घोडके, विलास बडवे, रत्नाकर अपस्तंभ, डॉ. ज्ञानेश्वर दराडे, डॉ. सुहास उरणकर, किशोर कुलकर्णी, अशोक गांधी, आर्मी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या नूतन मिश्रा, लक्ष्मणराव डहाळे, पवन नाईक, अमित काळे, सौ. आसावरी नातू आदी तसेच अनाहत एक कलासृष्टीचे पदाधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचा संयुक्त माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

### आठवणींना उजाळा, शाळेच्या विकासाचा संकल्प; माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी निवड


लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा संयुक्त माजी विद्यार्थी मेळावा माजी महापौर शिलाताई शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला.

नगर – लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा संयुक्त माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर शाळेच्या प्रांगणात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थिनींनी आपल्या शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा दिला. हसत–खेळत, कधी भावुक होत जुन्या मैत्रिणींनी बालपण पुन्हा जगल्याचा अनुभव व्यक्त केला.

या मेळाव्यातून माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून शाळेच्या शैक्षणिक, भौतिक व सामाजिक विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. शाळेच्या माजी विद्यार्थिनी व अहिल्यानगरच्या प्रथम महिला महापौर शिलाताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेवराव पांडुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी विद्यार्थिनी असलेल्या महिला पत्रकार प्रियंका चिखले, औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठाच्या माजी न्यायाधीश उमाताई संतोष बोरा, आशाताई जाधव, ज्योतीताई मोकळ, प्राचार्या सौ. छायाताई काकडे व मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मीताई आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मीनाक्षी खोडदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक महादेव भद्रे यांनी माजी विद्यार्थ्यांची माहिती देत माजी विद्यार्थी संघात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर सर्वानुमते माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी निवडण्यात आली.

प्रमुख पाहुण्या शिलाताई शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या शाळेनेच मला जीवनात भरारी घेण्याचा आत्मविश्वास दिला. ज्या शाळेत शिकून घडलो, त्या शाळेसाठी आज माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून काहीतरी करण्याची संधी मिळते आहे, याचा मला अभिमान आहे. पुन्हा शाळेत येताना वेगळाच आनंद आणि समाधान मिळत आहे.

यावेळी प्रियंका चिखले, उमाताई संतोष बोरा व आशाताई जाधव यांनीही आपल्या भावना व्यक्त करत शाळेनेच आम्हाला जीवनाची दिशा दिली असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानदेवराव पांडुळे म्हणाले की, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालय हे केवळ शिक्षण देणारे ठिकाण नसून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी एक संस्कारांची शाळा आहे. आज येथे एकत्र आलेले सर्व माजी विद्यार्थी हे या शाळेचे जिवंत वैभव आहेत. माजी विद्यार्थी संघ म्हणजे केवळ नावापुरती संस्था नसून, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणारी ताकद आहे. शैक्षणिक सुविधा वाढविणे, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे, शाळेच्या पायाभूत सुविधा सक्षम करणे आणि शिक्षक–विद्यार्थी नाते अधिक दृढ करणे, ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तर माजी विद्यार्थी संघाची भूमिका स्पष्ट करत शाळेसाठी उत्कृष्ट व प्रेरणादायी कार्य करण्याचे आवाहन केले.

मेळाव्यादरम्यान उपस्थित माजी विद्यार्थिनींनी आपल्या अनुभवांचे कथन करत जुन्या आठवणी सांगितल्या. विशेष म्हणजे विद्यालयाच्या प्रांगणात लहानपणी खेळले जाणारे पारंपरिक खेळ पुन्हा खेळून बालपण पुन्हा जगल्याचा आनंद त्यांनी घेतला.

यावेळी वैशाली कळसकर, उषा कटारिया, उमा धुपधरे, गिरीजा पवार, शेख फरजाना, नीता रासने, सुरेखा निमकर, शेख शदाब, मनीषा आरडे, सुनिता कानडे, सोनाली पोखरणा आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. एस. जी. पिसाळ यांनी केले. ज्येष्ठ शिक्षक महादेव भद्रे यांनी आभार मानले.

# नगरमध्ये ४ फेब्रुवारी रोजी 'जागेवर निवड संधी'उपक्रम

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

हा उपक्रम ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टी.व्ही. सेंटरजवळ, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या उपक्रमात स्नेहालय व क्लासिक व्हिल्स लिमिटेड, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर या दोन खासगी आस्थापना सहभागी होणार आहेत. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्याप सेवायोजन नोंदणी केली नसल्यास, त्यांनी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करावा. तसेच, उपक्रमाच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात.

उमेदवारांना www.ncs.gov.in या राष्ट्रीय करिअर सेवा संकेतस्थळावरही नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा. माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण (मो. ९४०९५५५४६५) यांच्याशी संपर्क साधावा, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# बँकिंगमध्ये करियर करायचे आहे?

रिझर्व्ह बँक देशभरातल्या बँकिंग क्षेत्रावर नियंत्रण ठेवते. या बँकेच्या देशभरात ३१ शाखा आहेत. स्पर्धा- परीक्षा आणि मुलाखतींच्या माध्यमातून उमेदवारांची निवड केली जाते. रिझर्व्ह बँकेच्या भरती प्रक्रियेविषयी जाणून घेऊ. प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा आणि लँग्वेज प्रोफिशिएन्सी टेस्ट म्हणजे एलपीटी असे टप्पे पार केल्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या नोकरीची कवाडं खुली होतात. प्राथमिक परीक्षेत उमेदवारांना एक तासाचा वेळ दिला जातो. १०० गुणांच्या पेपरमध्ये १०० प्रश्न विचारले जातात. इंग्रजी भाषेशी संबंधित ३० तर न्यूमरिकल एबिलिटी आणि रिजनिंगशी संबंधित प्रत्येकी ३५ प्रश्न विचारले जातील. प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुख्य परीक्षेला बसता येईल. मुख्य परीक्षेच्या पेपरसाठी उमेदवारांना दोन तास १५ मिनिटांचा कालावधी दिला जातो. मुख्य परीक्षेचा पेपर २०० गुणांचा असतो. २०० प्रश्न विचारले जातात. यात रिजनिंग, इंग्रजी भाषा, न्यूमरिकल अॅबिलिटी, जनरल अवेअरनेस, कॉम्प्युटर अशा विषयांवर आधारित प्रश्न विचारले जातात. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एलपीटीचं आयोजन केलं जातं. या परीक्षेत उमेदवारांचं स्थानिक भाषेविषयीचं ज्ञान तपासलं जातं. एलपीटीचा टप्पा यशस्वीपणे पार केल्यानंतर वैद्यकीय तपासणी तसंच कागदपत्रांची पडताळणी करून उमेदवारांची निवड केली जाते.




# जोश

## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| शुरू करते हैं फिरसे<br>मोहब्बत, तुम चले आओ...<br>थोडा हम बदल जाते हैं,<br>थोडा तुम बदल जाओ। | खामोशी की तह में<br>छुपा लिजिए उलझनें।<br>क्योंकी शोर कभी मुश्किले<br>आसान नहीं करता। | सुकून से<br>रहना चाहते हो<br>तो वादे<br>कम करो। |

# आईस्क्रीम सम्राट

**अचिव्हर**

वडिलांचा व्यवसाय दिवाळखोरीत निघाला तेव्हा तो फक्त १६ वर्षांचा होता. कुटुंबाला इतक्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, की त्याच्याकडे शाळेची फी भरण्यासाठीही पुरेसे पैसे नव्हते. त्याला शाळा सोडावी लागली आणि घरात अन्नाची समस्या निर्माण झाली. सर्व काही हळूहळू संपत चालले आहे, असे वाटत होते.

कुटुंबातील हा मुलगा उदरनिर्वाहासाठी छोटी-मोठी कामे करू लागला. त्याने लाकूड डेपोमध्ये काम करायला सुरुवात केली आणि फक्त ६५ रुपये कमवू लागला. कुटुंब कसे तरी उदरनिर्वाह करू शकले. वयाच्या २१ व्या वर्षी त्याला जाणवू लागले, की हे अत्यंत निराशेचे जीवन दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. त्यावेळी त्याने घेतलेल्या एका निर्णयाने केवळ त्याचेच नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचे जीवनच बदलून गेले. ही आरजी चंद्रमोगनची कहाणी आहे.

घरातील परिस्थितीने आरजी चंद्रमोगनला बळकट बनवले. त्याचा ६५ रुपयांचा पगार अपुरा पडला, तेव्हा त्याने गाडीतून कुल्फी विकायला सुरुवात केली. १९७० पर्यंत तो रस्त्यावरून कुल्फी विकत राहिला; परंतु त्याला समजले, की मोठे होण्यासाठी त्याला मोठी जोखीम पत्करावी लागेल. तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील तिरुथंगल शहरात जन्मलेल्या चंद्रमोगनने आपली वडिलोपार्जित जमीन विकली आणि २५ चौरस मीटर जागा भाड्याने घेतली. त्याने चेन्नईतील रॉयलापूरममध्ये एक लहानसे दुकान उघडले. चंद्रमोगनने ३ लोकांना कामावर ठेवले. ६ सायकली खरेदी केल्या आणि आईस्क्रीम बनवायला सुरुवात केली. दोन वर्षे तो घरी गेला नाही, कारखान्यात काम करत होता आणि तिथेच झोपत होता. तो आईस्क्रीम बनवून सायकलवरून रस्त्यावर विकत होता.


सहा महिन्यांतच त्याने १५ आईस्क्रीम गाड्या खरेदी केल्या. पहिल्या वर्षातच त्याला १.५ लाख रुपयांचा महसूल मिळाला. चार वर्षांतच त्याची कंपनी अरुण आईस्क्रीम आजूबाजूच्या कॅन्टीन आणि बाजारपेठेतील ९५ टक्के बाजारपेठ काबीज केली. १९८६ मध्ये, त्याने कंपनीचे नाव बदलून 'हॅटसन अॅग्रो प्रॉडक्ट्स' असे ठेवले. त्याच्या आईस्क्रीमच्या चवीने आश्चर्यकारक काम केले आणि विक्री वाढली. त्याने शुद्ध दुधापासून बनवलेल्या त्याच्या आईस्क्रीमचा मोठ्या प्रमाणात प्रचार केला. पुनर्ब्रँडिंगने त्याला चालना दिली. त्याचा व्यवसाय चेन्नईपासून तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा या बाजारपेठांमध्ये विस्तारला. त्या काळात, त्याने दक्षिण भारतात स्वतःला स्थापित करणाऱ्या क्वालिटी आणि दशप्रकाशसारख्या ब्रँडच्या प्रतिष्ठेला धक्का दिला. त्याने तामिळनाडूच्या बाजारपेठेचा ९५ टक्के हिस्सा काबीज केला. २०२० मध्ये 'अरुण'ने ५,००० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आणि भारतातील सर्वात मोठा खासगी डेअरी ब्रँड बनला. आज त्याची एकूण संपत्ती १९,०७७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

कंपनीचा व्यवसाय वाढत गेला, तसतसे त्याच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढत गेली. आज कंपनी आठ हजार लोकांना रोजगार देते. कंपनीकडे आता एक हजारांहून अधिक विशेष अरुण आईस्क्रीम पार्लर आहेत. तमिळनाडू, कर्नाटक, केरळ, गोवा आणि आंध्र प्रदेशात त्याचे वर्चस्व आहे. २०२३ पर्यंत, अरुण आईस्क्रीमची मूळ कंपनी, हॅटसन अॅग्रो प्रॉडक्ट लिमिटेडची मार्केट कॅप २१,२०० कोटी रुपयांची होती.



## फिटनेस

### दूर करा या गैरसमजुती




व्यायामाशी संबंधित बरेच गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर करण्याचा हा एक प्रयत्न...

□ वय वाढल्यावर फार व्यायाम करू नये, असं अनेकांना वाटतं. त्यामुळे काही लोक ठराविक काळानंतर व्यायाम थांबवतात. वय झाल्यामुळे वजन उचलता येणार नाही, फार शारीरिक श्रम करता येणार नाहीत, असाही समज असतो. प्रत्यक्षात हे चुकीचं आहे. व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावू शकते. तसंच जीवनशैलीशी संबंधित बरेच आजार नियंत्रणात राहू शकतात किंवा त्यांना प्रतिबंध करता येतो. □ आजारपणात व्यायाम करू नये, असाही एक समज आहे. आजारी पडल्यावर शरीर दमतं, थकतं. पण अजिबात व्यायाम किंवा शारीरिक हालचाल करायची नाही असा याचा अर्थ होत नाही. अतिव्यायाम टाळणं गरजेचं आहे. पण थोड्या हालचालीमुळे तुम्ही लवकर बरे होऊ शकता. □ फिट राहण्यासाठी तासभर व्यायाम करणं गरजेचं आहे असंही अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात काही मिनिटांचा व्यायामही तुम्हाला सगळे लाभ मिळवून देऊ शकतो. चालणं, धावणं, जिने चढणं अशा व्यायामांमुळेही तसंच घरातल्या कामांमुळेही तुमचा व्यायाम होऊ शकतो. □ कामानिमित्ताने चालणं किंवा धावपळ करणं व्यायामासारखंच आहे असं अनेकांना वाटतं. पण तीव्र स्वरुपाच्या व्यायामाच्या यापेक्षा अधिक कॅलरी खर्च होतात. अर्थात ही हालचालही शरीरासाठी गरजेची आहे. मात्र यासोबतच व्यायाम करणंही गरजेचं आहे. □ व्यायाम केल्यामुळे अंग दुखेल, दुखापत होईल, स्नायू दुखतील म्हणून बरेच जण व्यायाम टाळतात. पण व्यायामामुळे होणारे लाभ लक्षात घेतले तर व्यायामाला पर्याय नाही हेच खरं. योग्य पद्धतीने व्यायाम केल्यास अंगदुखी, स्नायूदुखी अशा समस्या जाणवणार नाही.

## झटपट रेसिपी

### कुरकुरित ओनियन रिंग्ज



चहासोबत काहीतरी गरमागरम आणि चविष्ट खायचं असेल तर तुम्ही कुरकुरीत ओनियन रिंग्ज बनवू शकता.


साहित्य : एक कप मैदा, अर्धा चमचा मीठ, अर्धा चमचा बेकिंग पावडर, एक चमचा गार्लिक पावडर, एक चमचा मिरपूड, एक चमचा ऑरिगॅनो, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, एक चमचा दूध, अर्धा कप पाणी, एका अंड्याचा पांढरा भाग, दोन कांदे आणि ब्रेड क्रम्स.

कृती : एका भांड्यात मैदा, बेकिंग पावडर, मिरपूड, गार्लिक पावडर, ऑरिगॅनो आणि मीठ घाला. आता यात ऑलिव्ह ऑईल आणि पाणी घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. आता कांद्याचे गोलाकार काप करून घ्या. हे काप पंधरा मिनिटं बाजूला ठेवा. आता कांद्याचे काप मैद्याच्या मिश्रणात घोळवून घ्या. एका भांड्यात अंड्याचा पांढरा भाग फेटून घ्या. त्यात मीठ आणि मिरपूड घाला. आता मैद्याच्या मिश्रणातले कांदे अंड्यात घाला. या कांद्याच्या रिंग्ज एका थाळीत पसरवा. त्यावर ब्रेड क्रम्स भुरभुरा. यामुळे कांद्याच्या रिंग्ज मस्त कुरकुरीत होतील. आता एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात ओनियन रिंग्ज सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. सॉससोबत खा.

# व्हॉट्सअॅप वेबवरून करा कॉल

**अॅप वर्ल्ड**

व्हॉट्सअॅप आपल्या युजर्सचा अनुभव आणखी चांगला करण्यासाठी सतत नवनवीन प्रयोग करत आहे. या मालिकेतील पुढचे मोठे पाऊल म्हणजे व्हॉट्सअॅप वेब वरून ग्रुप व्हॉईस आणि व्हिडीओ कॉलिंगची सुविधा उपलब्ध करून देणे. आतापर्यंत ग्रुप कॉलिंगचे फीचर प्रामुख्याने मोबाईल पुरते मर्यादित होते, परंतु आता वेब ब्राउझरवर हे फिचर आल्यामुळे डेस्कटॉप किंवा लॅपटॉपवरून काम करणाऱ्या युजर्सना मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे मोठ्या स्क्रीनवर संवाद साधणे पूर्वीपेक्षा अधिक सुलभ आणि प्रभावी होईल.



या नवीन अपडेटमध्ये सर्वात महत्त्वाचे फीचर म्हणजे 'कॉल लिंक्स'. आपण झूम किंवा गुगल मीटवर मीटिंगची लिंक शेअर करतो त्याचप्रमाणे व्हॉट्सप वेबवरही कॉलची लिंक तयार करता येईल. ही लिंक कोणत्याही व्यक्तीला किंवा ग्रुपमध्ये पाठवून त्यांना कॉलमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करता येईल. हे फीचर केवळ व्यक्तिगत संवादासाठीच नाही तर लहान व्यवसायिक मीटिंग्स किंवा कौटुंबिक संवादासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे कोणालाही सहजपणे कॉलला जोडले जाणे शक्य होईल.

कॉलिंगच्या अनुभवात आणखी एक भर टाकणारे फीचर म्हणजे 'कॉल शेड्युलिंग' या सुविधेमुळे वापरकर्ते विशिष्ट वेळी होणाऱ्या ग्रुप कॉल्सचे नियोजन आधीच करू शकतील. यामुळे नियोजित वेळी सर्व सहभागींना आपोआप सूचना मिळेल. त्यामुळे महत्त्वाच्या चर्चा किंवा बैठका चुकण्याची शक्यता कमी होईल. ऑफिसमधील कामाचे नियोजन करणाऱ्या लोकांसाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे टूल ठरेल.

# फोन हॅक झालाय?

**बी केअरफुल**

डिजिटल युगात इंटरनेट आणि स्मार्टफोन हे संपर्काचे नवीन आयुध बनले आहे. त्याचबरोबर सायबर भामट्यांचे जाळेसुद्धा वाढले आहे. सामान्यांना फसवण्यासाठी सायबर भामटे टपलेले असतात. त्यामुळे आमिष दाखवून हे लोकांना जाळ्यात अडकवतात, बँक खात्यातून रक्कम काढतात अथवा वैयक्तिक माहिती चोरतात आणि सार्वजनिक करण्याची भीती दाखवून ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करतात. फोन हॅक झाल्यावर सर्वात अगोदर काय करायला हवे हे तुम्हाला माहिती आहे का?



**बँकेशी संपर्क साधा**

मोबाईल हॅक झाला असे लक्षात आले, तर सर्वप्रथम बँकेशी संपर्क साधा. तुमचे क्रेडिट कार्ड असलेल्या संस्थेशी संपर्क साधा. काही कालावधीसाठी त्याचा वापर थांबवण्याची विनंती करा.

**पासवर्ड बदला**

सर्वात महत्त्वाचं काम म्हणजे तुमच्या फोनशी जोडलेल्या सर्व साईट आणि इतर प्लॅटफॉर्मवरील पासवर्ड लगेच बदला. त्यामुळे तुमची माहिती सुरक्षित राहील.

**संशयित अॅप्स हटवा**

तुमच्या फोनमधील सर्व संशयित अॅप्स हटवा. तसेच व्हॉट्सअॅप, ई-मेल अथवा इतर प्लॅटफॉर्मवरील संशयित लिंक्स हटवा. फोन रिस्टार्ट करा. पुन्हा हे संशयित अॅप्स आहेत की नाही ते तपासा. जर असतील ते मोबाईल सेटिंगमधील अॅप्समधून हटवा.

**फोन फॅक्ट्री रिसेट करा**

तुम्हाला पॉप अप वा मालवेअर अॅप्स दिसत असतील, तर मात्र तुम्ही तातडीने फोन फॅक्ट्री रिसेट करा. अर्थात हा अखेरचा उपाय आहे. या प्रक्रियेमुळे फोनचा सर्व डेटा डिलिट होईल.

५. तुमच्या मित्रांना सांगा


मित्रांना आणि कॉन्टॅक्ट यादीतील परिचितांना फोन हॅक झाल्याची माहिती द्या.

६. सायबर सेलला तक्रार करा

फोन हॅक झाल्याचा तुमचा अंदाज असेल तर लगेच स्थानिक सायबर सेलकडे तक्रार करा.

# मी योग्य करतोय का?

**मॅच मेकिंग**



मी २२ वर्षांचा तरुण असून एक ओळखीतली मुलगी मला आवडते. ती २६ वर्षांनी असून एमडी करते आहे. माझं आर्किटेक्चरचं शिक्षण सुरू असून अजून एक वर्ष बाकी आहे. मधल्या काळात तिचं लग्न ठरलं. लवकरच तिचं लग्न होणार आहे. मी शिक्षणासाठी दुसऱ्या शहरात असल्यामुळे तिच्यासोबत फार वेळ घालवायची संधी मिळाली नाही. यंदाच्या ख्रिसमसला आम्ही भेटलो. तिच्यासोबत बराच वेळ घालवला. दोन दिवसांनी मी तिला मेसेज पाठवून प्रेमाची कबुली दिली. पण तिने नकार दिला. यानंतर तिने मला सोशल मीडियावर ब्लॉक केलं आहे. तिलाही मी आवडतो, असं मला वाटतं. पण लग्न ठरल्यामुळे ती काही बोलू शकत नाही. मीही तिच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केलेला नाही. तिला टाळणं योग्य आहे का? मला मार्गदर्शन करा.

उत्तर : तिच्या इच्छेचा मान ठेऊन तूही तिच्याशी संपर्क करणं बंद केलं आहेस. मला वाटतं तिच्याकडून प्रतिसाद मिळेपर्यंत तू तिच्याशी संपर्क करू नकोस. त्यातच तुम्ही दोघं आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहात. ती एमडी करते आहे तर तुझं आर्किटेक्चर व्हायचं आहे. तिच्या आयुष्याचा निर्णय घेतला आहे. नव्या नात्यासोबत तिला पुढे जायचं आहे. त्यामुळे तूही तिचा विचार करू नकोस. तिच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही तर अजिबात उदास होऊ नकोस. तूही तुझ्या आयुष्यात पुढे जा. भविष्याचा विचार कर. तुलाही चांगला जोडीदार मिळेल.

# हेल्थ सायन्समधील विविध पदवी अभ्यासक्रम

**उच्च शिक्षण**

'एमआयटी-एडीटी' विद्यापीठाने 'अलाईड हेल्थ सायन्सेस'मधील पदवी अभ्यासक्रम राबवण्यासाठी 'अपोलो हेल्थकेअर अकादमी'सोबत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे विद्यापीठाच्या आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि अपोलोच्या क्लिनिकल अनुभवाचा वापर करून अॅनेस्थेसिया आणि ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी, मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी यांसारख्या विषयांमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरू होतील.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात अलाईड हेल्थ व्यावसायिकांची कमतरता आहे आणि वृद्ध लोकसंख्या वाढल्याने ही गरज अधिक वाढत आहे. या भागीदारीमुळे कुशल आणि तयार पदवीधर तयार होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, वर्गखोल्या, डिजिटल लर्निंग सिस्टम उपलब्ध असतील. यात हॉस्पिटल रोटेशन, अंतिम वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप, ब्रिज प्रोग्राम्स, भाषा प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सपोर्ट यांचा समावेश असेल.

अपोलो नॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवरामकृष्णन व्यंकटेश्वरन म्हणाले, अपोलो हेल्थकेअर अकादमी वर्गातील शिक्षण आणि रुग्णालयातील प्रत्यक्ष सराव यातील दरी भरून काढण्यासाठी वचनबद्ध आहे. ही भागीदारी विद्यार्थ्यांना भारतात आणि जागतिक स्तरावर यशस्वी होण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास, एक्सपोजर आणि कौशल्ये प्रदान करेल. जगभरातील आरोग्य प्रणालींना योगदान देण्यासाठी तयार असलेल्या आरोग्य सेवा व्यावसायिकांच्या पुढच्या पिढीला सक्षम करण्याचा हा आमच्या कार्यबल विकास उपक्रमांमधील एक भाग आहे.

अलाईड हेल्थ सायन्सेस म्हणजे काय?

हे पॅरामेडिकल किंवा सपोर्टिव्ह हेल्थकेअर क्षेत्र आहे. डॉक्टर आणि नर्सेस रुग्णांचे मुख्य उपचार करतात, तर अलाइड हेल्थ प्रोफेशनल्स त्यांना आवश्यक तांत्रिक, डायग्नोस्टिक, थेरपी आणि इतर सेवा देतात. जागतिक आरोग्य संघटना आणि इतर संस्थांच्या व्याख्येनुसार हे व्यावसायिक रोग प्रतिबंध, निदान, उपचार आणि पुनर्वसनासाठी विशेष कौशल्ये वापरतात.



**अभ्यासक्रम**

अॅनेस्थेशिया आणि ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी
मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी
क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी
रेडिओलॉजी/इमेजिंग टेक्नॉलॉजी
फिजिओथेरपी
ऑक्युपेशनल थेरपी
स्पीच आणि लँग्वेज थेरपी
ऑप्टोमेट्री
न्यूट्रिशन आणि डायटेटिक्स
रेस्पिरेटरी थेरपी
कार्डियाक केअर टेक्नॉलॉजी

# माहिती नोकरीच्या संधींची

**रोजगारवाटा**

भारतातील प्रोफेशनल्सनी परिवर्तनासाठी मोठ्या महत्त्वाकांक्षेसह नवीन वर्षामध्ये प्रवेश केला आहे. 'लिंक्डइन'च्या नवीन संशोधनामधून निदर्शनास येते, की, २०२६ मध्ये ७२ टक्के प्रोफेशनल्स नवीन पदाचा शोध घेत आहेत.

एक-तृतीयांशपेक्षा अधिक प्रोफेशनल्सना झपाट्याने बदलत असलेल्या तंत्रज्ञानासह नोकरी करण्यास आवश्यक असलेल्यान कौशल्यांसाठी (३८ टक्के) आणि आजच्या वाढत्या स्पर्धेदरम्यानन वरचढ ठरण्यासाठी (३८ टक्के) तयार नसल्याचेदेखील वाटते. प्रोफेशनल्सना या अनिश्चिततेमधून मार्ग काढण्यास मदत करण्यासाठी 'लिंक्डइन'ने आपली 'जॉब्ज ऑन द राइज' २०२६ लिस्ट जारी केली आहे. एआय टॅलेंटसाठी वाढती मागणी दिसून येते. तंत्रज्ञानाव्यातिरिक्त या लिस्टमध्ये इतर पदांचा देखील समावेश आहे. त्यात कॉन्फरन्स प्रोड्युसर, डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी, ब्रँड कन्सल्टंट, स्ट्रॅटेजिक अॅडवायजर आणि व्हेटेरिनेरियनचा समावेश आहे. त्यातून शहरातील रोजगार बाजारपेठेत सर्जनशील, सल्लागार, नेतृत्व आणि विशेष व्यावसायिक क्षेत्रांमधील वाढ दिसून येते.

**मुंबईतील टॉप १० जॉब्ज ऑन द राइज**

१. एआय इंजीनिअर २. कॉन्फरन्स प्रोड्युसर
३. डायरेक्टर ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स
४. डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी
५. ब्रँड कन्सल्टंट ६. स्ट्रॅटेजिक अडवायजर
७. रिसर्च इन्स्ट्रक्टर ८. अॅडव्हर्टायझिंग मॅनेजर ९. व्हेटेरिनेरियन



# महाराष्ट्रात मिनी श्रीलंका


**भटकंती**

स्वच्छ निळाशार समुद्र, शुभ्र वाळू, नारळ सुपारीची हिरवळ आणि शांत वातावरण यामुळे ओळखली जाणारी ही जागा म्हणजेच महाराष्ट्रातील 'मिनी श्रीलंका'. कमी खर्चात निसर्गाचा मनमुराद आनंद घ्यायचा असेल, तर हे ठिकाण तुमच्या ट्रॅव्हल लिस्टमध्ये नक्की असायलाच हवं.

तारकर्लीचा समुद्र अतिशय स्वच्छ आणि नितळ आहे. दूरवर पसरलेलं निळसर पाणी आणि शांत लाटा पाहिल्यावर मन अक्षरशः प्रसन्न होतं. इथलं वातावरण गजबजलेल्या पर्यटनस्थळांपेक्षा खूप वेगळं आणि निवांत आहे. तारकर्ली बीचची खासियत म्हणजे त्याची पांढरी, मऊ वाळू. पायाखालून सरकणारी वाळू आणि पारदर्शक पाण्यात दिसणारे सामुद्रतळाचे रंग श्रीलंकेतील समुद्रकिनाऱ्यांची आठवण करून देतात.


समुद्राच्या काठालगत उभ्या असलेल्या नारळ आणि सुपारीच्या उंच झाडांमुळे परिसर अधिकच निसर्गरम्य दिसतो. या झाडांमुळे इथे एक वेगळीच उष्णकटिबंधीय (ट्रॉपिकल) अनुभूती मिळते. देवबागमध्ये करळी नदी अरबी समुद्राला येऊन मिळते. हा क्षण प्रत्यक्ष पाहणे म्हणजे निसर्गाचे अद्भुत रूप अनुभवणे. बोटीतून या संगमाचा अनुभव घेता येतो. तो पर्यटकांना फार आवडतो. तारकर्ली हे महाराष्ट्रातील स्कूबा डायव्हिंगसाठी ओळखलं जाणारं ठिकाण आहे. रंगीबेरंगी मासे, प्रवाळ (कोरल्स) पाहण्याची संधी इथे मिळते. याशिवाय स्नॉर्केलिंग, जेट स्की, बोट राईड अशा अनेक अॅडव्हेंचर अॅक्टिव्हिटीज उपलब्ध आहेत. गोवा किंवा परदेशी बीचेप्रमाणे इथे प्रचंड गर्दी नसते. त्यामुळे कुटुंब, मित्रमंडळी किंवा जोडप्यांसाठी हे ठिकाण सुरक्षित, स्वच्छ आणि निवांत सुट्टी घालवण्यासाठी उत्तम आहे. पासपोर्ट,व्हिसा किंवा मोठा खर्च न करता इथे परदेशासारखी मजा घेता येते.

महाराष्ट्रात राहूनच श्रीलंकेसारखा फील हवा असेल तर तारकर्ली- देवबाग हा उत्तम पर्याय आहे. ऑक्टोबर ते मार्च हा काळ या भागाला भेट देण्यासाठी सर्वात चांगला मानला जातो. या महिन्यात हवामान आल्हाददायक असतं आणि समुद्रही तुलनेने शांत असतो.



# वसंत ऋतूत ब्रँडेड पोशाख

**फॅशन पॅशन**



या वसंत ऋतूत पोशाखांसाठी लोफर्स हा एक उत्तम पर्याय आहे. गेल्या काही वर्षांपासून, डेनिम ट्रेंड सातत्याने ट्रेंड करत आहे. तो गडद होत चालला आहे, आणि योगायोगाने असो वा नसो, लोक कठीण, कच्च्या जपानी जीन्सच्या जगात अधिक रस घेत आहेत. जे. क्रू, नॉर्डस्ट्रॉम, बक मेसन आणि असंख्य इतर ब्रँड सेल्व्हेज डेनिम देतात. हे नियमित जीन्सपेक्षा अधिक टिकाऊ आहे, पण तुम्हाला खर्च थोडा कमी करायचा असेल आणि स्ट्रेची जीन्स हवी असेल, तर लिव्हाइस आणि मेडवेल हे उत्तम पर्याय आहेत. तुमच्या जीन्सशी तुमचा टॉप जुळवून पूर्ण कॅनेडियन टक्सिडो लूक निवडा. तो आजकाल नेहमीपेक्षा कूल आहे, किंवा पांढऱ्या टी-शर्ट किंवा स्ट्राइप्ड बटण-डाउन शर्टसह त्याला एक नवीन ट्विस्ट द्या. 'ईस्ट कोस्ट प्रीपी' शैलीच्या वाढत्या ट्रेंडमध्ये एर्न जॅकेट बसतात; परंतु आता ते खूप लोकप्रिय झाले आहेत. टिकाऊपणा आणि व्यावहारिकतेसह सहज विंटेज आकर्षणाचे संयोजन करणारे हे जॅकेट वसंत ऋतूसाठी परिपूर्ण आहेत. शॉर्ट्ससह घालण्यासाठी पुरेसे हलके, थंड वारा सहन करण्यासाठी पुरेसे उबदार आणि तुमच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू वाहून नेण्यासाठी सर्व खिसे असलेले प्राडा आणि मार्गिएला सारख्या ब्रँडचे जॅकेट मिळू शकतात.

# ‘नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर ग्रीनफिल्ड’ महामार्गास केंद्राची मंजुरी : खा. नीलेश लंके

नगर - केंद्रीय मंत्रिमंडळाने नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर-अक्कलकोट या ६ पदरी, प्रवेश-नियंत्रित (क्सेस कंट्रोल्ड) ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पास मंजुरी दिली असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय दर्जाच्या द्रुतगती महामार्ग जाळ्यात होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने अहिल्यानगरला नवे महत्त्व प्राप्त होणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.



या महामार्गाची एकूण लांबी सुमारे ३७४ किलोमीटर असून, सुमारे १९ हजार १४२ कोटींची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येणार आहे. ‘पीएम गतीशक्ती’ राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत विकसित होणारा हा महामार्ग पश्चिम किनारपट्टीपासून दक्षिण भारतापर्यंतचा एक महत्त्वाचा दळणवळण दुवा ठरणार आहे. परिणामी राज्यातील आणि देशातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी अहिल्यानगरचा संपर्क अधिक वेगवान व सुलभ होणार आहे.

महामार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ४५ टक्के घट होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ व्यापार, शेती आणि उद्योग क्षेत्राला मिळणार आहे. शेतमाल, दुग्धव्यवसाय तसेच कृषीपूरक उद्योगांच्या वाहतुकीवरील खर्चात लक्षणीय बचत होणार असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) लॉजिस्टिक्स अधिक सक्षम होणार आहे. यासोबतच औद्योगिक, गोदाम, प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीस चालना मिळणार असल्याचे अपेक्षित आहे.

या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांसाठी थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. सुधारित दळणवळण व्यवस्था आणि वाढणारी औद्योगिक गुंतवणूक यामुळे जिल्ह्याचा आर्थिक पाया अधिक भक्कम होणार असून, अहिल्यानगर केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे तर आर्थिक व औद्योगिकदृष्ट्याही केंद्रस्थानी येणार आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना खासदार निलेश लंके यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा महामार्ग अत्यंत निर्णायक ठरणार आहे. दळणवळण, व्यापार, शेती, उद्योग आणि रोजगार या सर्वच क्षेत्रांना या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळेल. केंद्र सरकारने अहिल्यानगरच्या विकास क्षमतेवर दाखवलेला विश्वास महत्त्वाचा असून, या महामार्गाचा जिल्ह्याला जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# ‘कैद्यांची संस्कार शाळा’उपक्रमामुळे जिल्हा कारागृहातील बंदीवानांचे मनोबल उंचावले

नगर - महाराष्ट्र शासनाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्हा कारागृहात (वर्ग-२) बंदीवानांच्या मानसिक प्रबोधनासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जन शिक्षण संस्थानच्या सहकार्याने आयोजित ‘कैद्यांची संस्कार शाळा’ या उपक्रमात महसूल सहायक अशोक मासाळ यांनी केलेल्या मार्गदर्शनातून बंदीवानांना नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या या योगदानाबद्दल कारागृह प्रशासनाकडून त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. माणूस चुकू शकतो, परंतु सुधारण्याची संधी प्रत्येकाला असते, अशा शब्दांत अशोक मासाळ यांनी बंदीवानांशी संवाद साधला. शिक्षा भोगणे हा केवळ दंड नसून ती स्वतःला बदलण्याची एक संधी आहे. मनात जिद्द असेल तर कारागृहातून बाहेर पडल्यानंतरही एक यशस्वी व सन्माननीय नागरिक म्हणून जगता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बंदीवानांच्या शंकांचे निरसन करत त्यांनी अत्यंत तन्मयतेने व आपुलकीने मार्गदर्शन केले. केवळ कारागृहातील सुधारणा नव्हे, तर समाजात बालगुन्हेगारी रोखणे व तरुण वयात चुकीच्या मार्गाला लागलेल्या युवकांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणणे हे आपले ध्येय आहे. यासाठी शाळा-महाविद्यालयांच्या माध्यमातून ‘युवा सशक्तीकरण व युवाजागृती’ अभियान राबविण्याचा मानसही मासाळ यांनी यावेळी बोलून दाखवला.

श्री. मासाळ यांच्या मार्गदर्शनामुळे बंदीवानांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडल्याचे व त्यांचे मनोबल उंचावल्याचे दिसून आले. या निस्वार्थ सेवेची दखल घेऊन जिल्हा कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी मासाळ यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थानचे संचालक बाळासाहेब पवार, सय्यद, महसूल विभागाचे नायब तहसीलदार मोहसीन शेख, नायब तहसीलदार योगेश कुलकर्णी, विजय कवडे, ॲड. अनुराधा येवले, ॲड. सचिन बडे यांच्यासह जिल्हा कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



न्यूरॉन प्री स्कूलच्या प्राचार्या डॉ. संगीता मिसाळ यांनी राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कार स्विकारला.

# ‘राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कारा’ने ‘न्यूरॉन’च्या प्राचार्या संगीता मिसाळ सन्मानित

नगर - शिक्षण क्षेत्रात गेली ३३ वर्षे सातत्यपूर्ण व निष्ठेने कार्य करणाऱ्या डॉ. सौ. संगीता सुधांशू मिसाळ यांना ‘राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले. हा गौरव समारंभ १ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रिटायर्ड कर्नल सुनील राजदेव, सिने अभिनेत्री निवेदिता पगार तसेच क्विक रिप्लाय आयओचे फाउंडर व सीईओ ऋषिकेश खैरनार आदी उपस्थित होते.

डॉ. सौ. संगीता मिसाळ या गेली तीन दशके बालशिक्षण क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा दिली आहे. त्यांनी बालशिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती बालक केंद्रीत शिक्षण, मूल्याधिष्ठीत संस्कार व सर्वांगीण विकास यांचा पराभूषण समन्वय साधक निरोन प्री स्कूल ला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे त्यांच्या दूरदृष्टी व नेतृत्वगुणांमुळे शाळेने शिक्षण क्षेत्रात विश्वासार्ह स्थान मिळविले आहे.

न्यूरोल फ्री स्कूल ही विद्यार्थ्यांसाठी एक उत्कृष्ट व नावाजलेली शाळा म्हणून नावारुपास आली आहे व पालकांच्या विशेष पसंतीस पडली आहे.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. मिसाळ यांनी सन्मान आपल्या विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद आणि न्यूरॉन प्री स्कूलच्या समस्त परिवाराला समर्पित करत आभार व्यक्त केले व शिक्षण हे एक व्यवसाय नसून समाज घडविण्याचे पवित्र कार्य असल्याचे सांगितले व हा पुरस्कार भविष्यात अधिक गुणवत्तापूर्ण व नवीन शिक्षण देण्यासाठी प्रेरणादायी ठरेल असे नमूद केले.

# नागापूरच्या सनफार्मा विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

नगर - नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट रेखाकला परीक्षेत यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. अतिवृष्टीमुळे सप्टेंबर २०२५ मध्ये होऊ न शकलेली ही परीक्षा नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.



एलिमेंटरी व इंटरमिजिएट रेखाकला परीक्षेत यश मिळविणारे नागापूरच्या सनफार्मा विद्यालयाचे विद्यार्थी.

## एलिमेंटरी व इंटरमिजिएट रेखाकला परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

या परीक्षेस बसलेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवले. अ श्रेणीत २७ विद्यार्थी, ब श्रेणीत २६ विद्यार्थी आणि क श्रेणीत १२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक व आर.एस.पी. अधिकारी राज धस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांच्या अभिनंदनासाठी ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, सचिव बबनराव कातोरे, उपाध्यक्ष शांताराम गाडे पाटील, अभिषेक कळमकर, शाळा समिती अध्यक्ष सुदाम भोर, रावसाहेब सत्रे, प्रकाश गुगळे यांच्यासह सर्व संस्था पदाधिकारी उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

अ श्रेणीतील यशस्वी विद्यार्थी ओम धेंडुळे, आदिती धानुरकर, अनुजा मानमोडे, देवयानी जाधव, हर्षदा विघ्ने, इरा साळुंके, नयन महाजन, सेजल चव्हाण, श्रद्धां ओहोळ, श्रद्धा चिंचोळे, सिद्धेश कुटे, स्वरा कुर्टे, स्वरा जेवे, उदयन काळे आदी. तसेच ब श्रेणीत यश वाकचौरे, सोहम बोरुडे, रामेश्वर घोडके, ऋषिकेश जगताप, संस्कार साळवे, सार्थक जायभाय, श्रावणी ढगे, श्रावणी पवार, श्रेया केदार, अस्मिता उमाप, पायल राठोड, प्रणित अवसरे, प्रसाद पाटील यांनी यश संपादन केले.

महाराष्ट्र शासन आयोजित या परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा आई-वडिलांच्या हस्ते शासकीय प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. गुलाबपुष्प, पेढे भरवून टाळ्यांच्या कडकडाटात हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी कलाशिक्षक व आरएसपी अधिकारी राज धस यांनी कला विषयाचे महत्त्व विषद करताना सांगितले की, कला शिक्षणातून विद्यार्थ्यांना भविष्यात विविध करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. एक ते पाच वर्षांपर्यंत कला विषयातील डिग्री, तसेच ॲनिमेशन, पेंटिंग, कमर्शियल आर्ट, जी.डी. आर्ट, फोटोग्राफी, व्हिडिओ शूटिंग, टेक्सटाइल डिझायनिंग, ए.टी.डी. आदी अभ्यासक्रमांतून उत्तम प्रगती साधता येते. त्यामुळे कलेची आवड असलेल्या मुलांना पालकांनी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

# स्व. अजितदादांची नगर जिल्ह्यावर विशेष मेहेर नजर होती

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन; शोकसभेत स्व.अजितदादांना श्रद्धांजली वाहताना सभागृह भाऊक

नगर - उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा पूर्ण राज्यावर ठसा उमटला आहे. त्यांच्या निधनाच्या धक्क्यातून अजूनही राज्य सावरलेला नाही. ते जायच्या आदल्या दिवशीच मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांच्याशी माझी चर्चा झाली होती. सत्तेत राहिलेले व सत्तेच्या बाहेर गेलेले अजितदादा मी पहिले मी जवळून पहिले आहे. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला कामाचा ठसा उमटवत उत्कृष्ट काम केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही त्यांच्या कामाचा प्रभाव होता. प्रत्येकाला त्यांनी सहकार्यच केले. स्व.अजितदादांनी मांडलेल्या चांदा ते बांधा या संकल्पनेतून त्यांची पूर्ण राज्यात वेगळी ओळख निर्माण झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही त्यांच्याप्रती कायम वेगळी आस्था होती. आपल्या नगर जिल्ह्यावरही त्यांची विशेष मेहेर नजर होती. अशा कर्तृत्व संपन्न, निःस्वार्थपणे मैत्री जपणारा, सुख दुःखांच्या प्रसंगांना सर्वांना बरोबर घेणारा अष्टपैलू नेता आज आपल्यातून गेला आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी करून भारावलेल्या अंतकरणाने स्व.अजितदादांना श्रद्धांजली वाहिली.

अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सोमवारी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन येथील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात करण्यात आले होते. नगर शहरासह जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी या शोकसभेस उपस्थिती लावून स्व.अजितदादांच्या स्मृती जाग्या करत भाऊक होत भावना व्यक्त केल्या. त्यांच्या निधनाने राज्यात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याच्या भावना यावेळी उपस्थित बहुतांशांनी व्यक्त केल्या.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह उपस्थित नेत्यांनी स्व.अजितदादा पवारांच्या अस्थी कलशास व प्रतिमेस आदरांजली वाहिली. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिका राजळे, आमदार काशिनाथ दाते, आमदार हेमंत ओगले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अशुतोष काळे, आमदार किरण लहामटे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, व्हाईस चेअरमन माधवराव कानवडे, डॉ.सुजय विखे, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी आमदार भानुदास मुरकुटे, राजेंद्र फाळके, माजी आमदार नरेंद्र घुले, माजी मंत्री अण्णासाहेब मस्के, माजी कुलगुरू सर्जेराव निमसे आदींसह सर्व पक्षांचे पदाधिकारी, संघटना व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पुढे म्हणाले, राज्यात जनतेच्या मनातील सरकार आल्यावर झालेल्या राजकीय घडामोडींनंतर अजितदादांनी सत्तेत जाण्याचा निर्णय घेत मायुतीत सहभागी झाले. कौटुंबिक विषयाबाबत त्यांना मोठी किंमत मोजावी लागली पण त्यांनी परिणामांचा विचार केला नाही. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पत्नीच्या पराभवानंतरही ते खचले नाहीत. तर नव्या हिंमतीने उभे राहून विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाची वेगळी प्रतिमा त्यांनी राज्यात निर्माण केली. आमच्यात पुष्कळशा कटुता व संघर्ष राहिला आहे. पण एकदा मैत्री जमली कि सर्व काही होते. केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात त्यांनी आमच्या परिवारा बाबत कायम स्मरणात राहील अशी भूमिका त्यांनी मांडली.

बाळासाहेब थोरात म्हणाले, अवघा महाराष्ट्र नाहीतर देश स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या निधनाने हळहळला आहे. अजितदादांच्या निधनाच्या दिवशी मी उत्तराखंडात होतो तेथेही त्यांची चर्चा होती. सहकार क्षेत्रात त्यांचा गाढा अभ्यास होता, राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांची त्यांना इत्तमभूत माहिती असे. एखाद्या कारखान्यात खट वाजले तरी त्यांना कळे. हीच स्थिती सर्व जिल्हा बँका व बाजार समिती बाबत होती. माझा व त्यांचा वेगळा पक्ष असला तरी कायम आम्ही बरोबर राहिलो. त्यांनी जेव्हा जेव्हा कटू निर्णय घेतले तेव्हा तेव्हा त्यांनी जनतेच्या हितालाच प्राधान्य दिले व ते ठामपणे बोलून दाखवले. असा स्पष्टोक्ता, निर्णयक्षम व अष्टपैलू असलेले अजितदादा यांच्यासारखा नेतृत्व तयार होण्यास वर्षानुवर्षाची प्रक्रिया लागते.

आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, शेवगाव पाथर्डी मतदारसंघासाठी अजितदादा यांनी कायम मोठे सहकार्य करत विकासासाठी मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येक कार्यकर्त्याला बळ दिले. मी जिल्हा परिषदेची उपाध्यक्ष असतानाही त्यांनी मला मोठे सहकार्य केले आहे. न होणारे कामेही त्यांनी सांगितल्यावर तात्काळ होत असे. त्यांचा वक्तशीरपणा, संकट काळात धावून जाणे, स्वच्छता हे गुण शिकण्यासारखे आहेत. गोरगरिबांच्या तारणहार त्यांच्या रूपाने गेला आहे.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले, विकास कामांमध्ये कधीही राजकारण न आणणारे व्यक्तिमत्व अजितदादा होते. माझ्यासारख्या अनेक सामान्य कार्यकर्त्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी स्वतःहून मला उमेदवारी दिली व निवडून आणले. तसेच महानगर बँकेला सहकार्य केले.

आमदार आशुतोष काळे म्हणाले, कोपरगाव तालुक्याच्या विकास कामांसाठी भरपूर निधी देत त्यांनी विकासात मोठे सहकार्य केले. कायम मार्गदर्शन व योग्य सल्ला त्यांनी मला दिला. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे कामे त्यांनी प्राधान्याने केल्यामुळेच त्यांच्या अंत्यविधीला लाखोंचा जनसागर लोटला.

आमदार हेमंत ओगले म्हणाले, माझ्यासारख्या नवख्या आमदारांना त्यांची वागणूक व व्यक्तीमत्व हे खूप प्रभावित करणारे होते. ते खऱ्या अर्थाने सर्वांचे दादा होते.

आमदार विठ्ठल लंघे म्हणाले, राज्यात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडून त्यांनी वेगाने विक्रम केला आहे. त्यांच्याकडे काम घेऊन गेल्यावर त्यांनी तात्काळ स्पष्टपणे निर्णय घेत मार्गी लावली.

यावेळी अशोक सावंत, शशिकांत गाडे, सचिन गुजर, भानुदास मुरकुटे, दादा कळमकर, नरेंद्र घुले, राजेंद्र फाळके, संदीप वर्पे, अण्णासाहेब मस्के, माधवराव कानवडे आदींनी स्व. अजितदादा पवारांच्या स्मृतींना उजाळा दिला. आमदार संग्राम जगताप यांनी कृतज्ञता व्यक्त केली व पसायदानाने शोकसभेची सांगता झाली.

# श्रुती संगीत निकेतनच्या ‘कीर्तनरंग’ कार्यक्रमाला रसिकांची भरभरून दाद



नगर - श्रुती संगीत निकेतनच्या वैविध्यपूर्ण अनोख्या उपक्रमांपैकी एक अनोखा आगळावेगळा उपक्रम म्हणजे कीर्तन रंग. ३१ जानेवारी रोजी डॉ. धनश्री खरवंडीकर यांचे वडील शामराव कुलकर्णी यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त श्रुती संगीत निकेतनच्या वतीने लोणी प्रवरानगर येथील कीर्तनकार प्रभंजन बुवा भगत यांच्या नारदीय कीर्तनसेवेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त बुवा आफळे यांचे शिष्य असणाऱ्या प्रभंजन बुवांच्या कीर्तनशैलीवर आफळेबुवांचा प्रभाव जाणवत होता. मधुर आवाज, सुरेलपणा, उत्तम वक्तृत्व, आणि रंगतदार सादरीकरण यामुळे नगरकर रसिक कीर्तन रंगात अक्षरशः रंगून गेले, तल्लीन झाले. प्रभंजनबुवा भगत यांनी नामदेव महाराजांचा आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा हा अभंग निरुपणासाठी निवडला होता. हरी जयजय राम, रूप पाहता लोचनी यांमुळे त्यांच्या कीर्तनात वारकरी कीर्तनाची झलकही ऐकायला मिळाली. साईबाबांच्या चरित्रावर आधारित उत्तररंग रसिकांना आकर्षित करणारा होता. नगरकर रसिकांनी भरभरून दाद आणि प्रतिसाद दिला.

किर्तनरंग कार्यक्रमात सुरुवातीला अमृतमहोत्सवा निमित्ताने श्यामराव कुलकर्णी यांचा आणि त्यांच्या पत्नी सौ.अलका कुलकर्णी यांचा नगरचे जेष्ठ साहित्यिक डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे आणि सौ.उषाताई सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. अमोल हातवळणे गुरुजी यांनी केलेल्या मंत्रोच्चाराच्या जयघोषात शामराव कुलकर्णी यांचे ७५ दिव्यांनी औक्षणही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर हृषिकेश कुलकर्णी यांनी केले. कलाकारांचा परिचय अनिकेत देऊळगावकर यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रुती संगीत निकेतनच्या अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी केले. श्रुती संगीत निकेतनच्या अनोख्या उपक्रमाचे रसिकांनी मनापासून कौतुक केले.

कीर्तनासाठी तबल्याची उत्तम साथ नगरचे तबलावादक हर्षद भावे आणि ऑर्गनची पूरक समर्पक साथ मकरंद खरवंडीकर यांनी केली, टाळाची सुंदर साथ किरण जोशी यांनी केली. कीर्तनात पूर्व रंग झाल्यानंतर शौनक कुलकर्णी यांनी माझ्या वडिलांची मिराशी गा देवा हा अप्रतिम अभंग सादर केला.

या कार्यक्रमासाठी रंगीबेरंगी फुलांची व रंगमंचाची आकर्षक सजावट श्री.व सौ.आगलावे यांनी केली. या मनमोहक सजावटीने सभागृहात येतानाच सर्व रसिकांचे लक्ष वेधून घेतले. उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था सचिन चव्हाण यांनी केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैष्णवी पटवा, आर्या कुलकर्णी, स्वराली जोशी, भूषण भणगे, वेदांत कुलकर्णी, सौ.सानप मॅडम, समर्थ कोर्टीकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी लक्ष्मणराव डहाळे, अविनाश देऊळगावकर, दीपक शर्मा, क्षमा सदानंद भणगे, सविता काळे, कुमुदिनी बोपर्डीकर, अनुजा कुलकर्णी, डॉ.अशोक काळे, स्नेहा रानडे, दत्ता गोरे, संकेत शाह इत्यादी उपस्थित होते.



## अजित दादांची एक आठवण...

३ फेब्रुवारी २०१४ रोजी नगर येथे लोकसभा निवडणुकीसाठी आयोजिलेल्या दिवंगत आमदार राजीव राजळे यांच्या मेळाव्यासाठी हुंडेकरी लॉन येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आले असता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बाबुर्डी घुमट येथील केंद्राला शासनाची प्रशासकीय परवानगी द्यावी याचे पत्र नगर मधील सर्व सीनेट सदस्यांच्यावतीने देताना प्रशांत गडाख, प्रा. शिवाजी साबळे आदी.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

